रायगड, सोमवार, दि. २३ मार्च २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

सी साईट रिसॉर्ट (नागांव)
कुक, वेटर व हाऊसकिपींग स्टाफ पाहिजे
संपर्क : ९४२२८५६३३६ ७३८५९६५८८५

## युद्ध काळात भारताचा मास्टरस्ट्रोक

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत सुरू अमेरिका -इस्रायल आणि इराण युद्धामुळे भारतातही एलपीजीच्या तुटवड्याची चिन्हे दिसत असतानाच आता एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. रविवारी (दि.२२) पाइक्सिस पायनियर जहाज मोठ्या प्रमाणावर एलपीजी गॅस घेऊन समुद्रातून धावत भारतात दाखल झाले आहे. आगामी काही आठवड्यातच न्यू मंगळुरू बंदरात तब्बल ७२७०० टन एलपीजी साठा पोहोचण्याची शक्यता आहे. याला रविवारपासून सुरुवात झाली. सिंगापूरचा ध्वज असलेले पाइक्सिस पायनियर हे जहाज १६७१४ टन गॅस घेऊन भारतात पोहोचले.

# पाण्यासाठी वणवण थांबेना! | महिलांची दोन किलोमीटर पायपीट

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पाणीटंचाई दूर करण्यासाठी कोट्यवधींचे आराखडे, योजना आणि घोषणा केल्या जातात; मात्र प्रत्यक्षात नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे भीषण वास्तव रायगड जिल्ह्यात समोर आले आहे. रोहा तालुक्यातील २६ गावांसाठी कोट्यवधी रुपये खर्च करूनही आजही महिलांना डोक्यावर हंडे, प्लास्टिकचे ड्रम घेऊन तब्बल दोन किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याने संताप उफाळून आला आहे.

रोहा तालुक्यातील शेणवई,

### कोट्यवधींचे आराखडे फसवे

शेणवईवाडी, शेणवई आदिवासीवाडी, लक्ष्मीनगर, डोंगरी, खार, वावेखार, झोलंबे, झोलंबे आदिवासीवाडी, भातसई, खारआपटी, निडी, पडम, यशवंतखार, धोंडखार, करंजवीरा आदी २६ गावांसाठी अनेक वर्षांपासून पाणीपुरवठा योजना राबविल्या जात आहेत. मात्र, कोट्यवधी रुपये खर्चूनही



या गावांमध्ये पाण्याचा थेंबही घरापर्यंत पोहोचलेला नाही, अशी स्थिती आहे.

जलजीवन योजनेंतर्गत पाईपलाईन टाकण्यात आली, कामे पूर्ण झाल्याचे दाखवले गेले; पण प्रत्यक्षात नळ कोरडेच असल्याचा संताप ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, योजना कागदावर पूर्ण, पण गाव तहानलेलेफ असे वास्तव या भागात पाहायला मिळत आहे. अनेक वेळा ग्रामस्थ आणि महिला शासन दरबारी धाव घेत असतानाही केवळ आश्वासनांचीच बरसात होत असून, अंमलबजावणी मात्र शून्य असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सध्या सण-उत्सव आणि लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाही पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गावागावात उत्सवांचा जल्लोष सुरू असताना महिलांना २० ते २५ मिनिटे उन्हात चालत जाऊन पाणी आणावे लागत आहे. काही ठिकाणी महिलांना प्लास्टिकचे ड्रम, हंडे डोक्यावर वाहून पाणी आणण्याची वेळ आली आहे.

पाणीपुरवठा योजनांवर कोट्यवधींचा खर्च करूनही प्रत्यक्षात सुविधा मिळत नसल्याने ज्ञ्हा पैसा गेला कुठे?फ असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे आजही नागरिकांना मूलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या तडाख्यात पाण्यासाठी रांगा, पायपीट •> पान २ वर

## वेधक

### महिला सरपंचाला मारण्याची धमकी

**महाड :** पोलादपूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सवाद येथील महिला सरपंचाला जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. तालुक्यातील सवाद या ग्रामपंचायतीच्या सरपंच म्हणून त्या कार्यरत आहेत. सविस्तर माहिती अशी की सवाद गावातील हनुमान मंदिरामागे जेसीबी मशीनच्या सहायाने खोदकाम सुरू होते, हे काम पाहण्यासाठी सरपंच व उपसरपंच घटनास्थळी पोहोचून विचारणा करीत होते. मात्र खोदकाम करणाऱ्याने उलट जबाब करीत सरपंच व उपसरपंच यांना तुम्ही काम बंद करणारे •> पान २ वर

### भीषण अपघातात तिघांचा मृत्यू

**मनोर :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वाघोबा खिंड परिसरात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला. वाहनाने दिलेल्या धडकेनंतर चालक फरार झाला असून, पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. या अपघाताच्या काही तास आधी महामार्गावर चार-पाच वाहनांची धडक होऊन विचित्र अपघात झाला होता. त्यात सुदैवाने कोणती जिवितहानी झाली नव्हती, मात्र अपघातानंतर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. मुंबई- •> पान २ वर

### दोनशे रुपयांत जमिनींचे पोटहिस्से

**मुंबई :** एकत्र कुटुंबाच्या जमिनीचे पोट हिस्से आता अवघ्या दोनशे रुपयांमध्ये होणार आहेत. राज्य भूमी अभिलेख विभागाने ममोजणी फीमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेत, त्याबाबतचे आदेश काढले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाचून दिलासा मिळणार आहे. तर भूमी अभिलेख विभागाचे नकाशे व सातबारे अद्ययावत होणार आहेत. लवकरच याची अंमलबजावणी सुरू होणार आहे. एकत्र कुटुंबातील सदस्यांच्या नावे जमिनीचे पोट हिस्से करण्यासाठी दोन हेक्टरांपर्यंत •> पान २ वर

## कोट्यवधींची गुजरात बनावटीची विदेशी दारू जप्त

# टँकरमध्ये मद्य तस्करी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

गुजरात राज्यातून महाराष्ट्रात विदेशी दारूची तस्करी होत असल्याची माहिती नेरळ पोलिसांना मिळाली होती. मद्याची तस्करी रोखू तस्कारांना आळा घालण्यासाठी नेरळ पोलिसांनी मुरबाड कर्जत राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर वारे गावच्या हद्दीत सापळा रचला. पोलिसांनी रचलेल्या सापळ्यात मद्य तस्कारांचा टँकर अडकला. या टँकरमधून तब्बल एक कोटींचे विदेशी मद्य पोलिसांनी हस्तगत केले असून टँकर चालकाला मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.



नेरळ पोलिसांना गुप्त बातमीदारांच्या माध्यमातून बनावट विदेशी दारूची तस्करी होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सदरच्या गुन्ह्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांना देण्यात आली. पोलीस उप अधीक्षक राहुल गायकवाड यांचे मार्गदर्शन घेऊन नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांनी गुप्तचरांच्या माहितीनुसार २१ मार्च रोजी नेरळ पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि अंमलदार यांच्या संयुक्त तपास पथकाने सापळा रचला. महामार्गावर सहायक पोलीस निरीक्षक वरोटे, पोलीस उप निरीक्षक सुनील शेंबडे, किसवे, पोलीस हवालदार पिंगळे, गुजराती, लावरे, खंडागळे, वाघमारे, गर्जे, राजाभाऊ केकान, आशू बेंद्रे, पिसाट, वांगणेकर, कनके, डाखोरे, काळे यांच्या पथकाचा समावेश होता. मुरबाड कर्जत राष्ट्रीय महामार्गावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या संशयित टँकरचा पोलिसांच्या पथकाने पाठलाग केला. नेरळ पोलिसांनी वारे येथील कोकण किनारा हॉटेल येथे संशयास्पदरित्या भरधाव वेगाने जाणारा (जीजे १२, ए डब्लू ४४२१) हा टँकर ताब्यात घेतला. टँकर चालक लादुराम खियाराम बिष्णोई हा गोवा बनावटीची दारूची विनापरवाना वाहतूक या टँकरमधून करत होता.

### नेरळ पोलिसांची धडक कारवाई

२९ लाख रूपये किमतीचा टँकर ताब्यात घेण्यात आला असून त्या टँकरमध्ये ४१ लाख २८ हजाराची एव्हरग्रीन व्हिस्की, १५ लाखाची मोबी ऑरेंज व्हिस्की आणि १६ लाखाचा वोडका असा साधारण एक कोटी एक लाख २७ हजाराचा माल जप्त केला.

## डिझेल दरवाढीचा मच्छिमारांना फटका

### प्रति लिटर २२ रुपयांचा अतिरिक्त भार; व्यवसाय अडचणीत

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मध्य पूर्वेतील तणाव आणि जागतिक बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम आता महाराष्ट्रातील मच्छिमारांवर दिसू लागला आहे. तेल कंपन्यांनी २० मार्चपासून बल्क ग्राहकांसाठी डिझेलचे दर वाढवले असून, त्यामुळे मच्छीमार सहकारी संस्थांना प्रति लिटर सुमारे २२ रुपये अधिक मोजावे लागत आहेत. त्यामुळे मासेमारी व्यवसाय अडचणीत येण्याची भीती मच्छिमारांनी व्यक्त केली आहे.

सध्या सर्वसामान्य ग्राहकांना पेट्रोलपंपावर डिझेल सुमारे ९०.०३ रुपये प्रतिलिटर दराने मिळते. मात्र, मच्छिमार सहकारी संस्थांना बल्क कन्झ्युमर म्हणून वर्गीकृत केल्यामुळे त्यांना हेच डिझेल ११२ रुपयांपेक्षा जास्त दराने खरेदी करावे लागत आहे. या दरातील मोठ्या फरकामुळे मच्छिमारांमध्ये नाराजी आहे. शहरातील आलिशान वाहनांसाठी डिझेल कमी दरात मिळते; मात्र देशाच्या अन्नसाखळीला हातभार लावणाऱ्या मच्छिमारांना जास्त दर द्यावा लागतो, ही दुर्दैवी बाब आहे.



या दरवाढीचा परिणाम राज्यातील सुमारे ३.६ लाख मच्छिमारांच्या उपजीविकेवर होत आहे, असे मच्छिमारांचे म्हणणे आहे. २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्धाच्या वेळीही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी मच्छिमार आणि शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र तिसरा प्रवर्ग तयार करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्यावर अद्याप कायमस्वरूपी निर्णय झालेला नाही.

**मच्छिमारांच्या प्रमुख मागण्या**

कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांच्या वतीने काही प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. मच्छिमार सहकारी संस्थांना बल्क श्रेणीतून वगळावे, प्राथमिक क्षेत्रासाठी स्वतंत्र दररचना करावी आणि मत्स्यव्यवसायाला शेतीप्रमाणे इंधन सवलत •> पान २ वर

## हॉटेल, उपहारगृहांना २० टक्के गॅस पुरवठा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार व्यापारी एलपीजीचा अतिरिक्त २० टक्के पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.



केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय यांनी २१ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते.

> या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल व खाद्य व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळेल. मात्र, गॅस पुरवठा मिळवण्यासाठी संबंधित व्यावसायिकांनी तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे तसेच पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक राहणार आहे.
>
> - छगन भुजबळ
> अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त २० टक्के वाटप वाढविण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा पूर्वीच्या संकटपूर्व पातळीच्या सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग आणि दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. यासोबतच राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

दरम्यान, राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने आपोआप नूतनीकरण झाल्याचे मानण्यात येणार असून, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, •> पान २ वर

## राजपुरी-खोकरी रस्ता बंद करणार

### विजय गिदी यांचा इशारा । सार्वजनिक बांधकाम खात्यास दिले निवेदन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

राजपुरी कोळीवाडा परिसरात मुख्य गटाराचे पाणी समुद्रात जावे यासाठी साकवाचे काँक्रिटीकरण करण्यात आले होते. प्रवासी वर्गासाठी एक उत्तम सोय प्रदान करण्यात आली होती.परंतु संबंधित ठेकेदाराने संपूर्ण काम पूर्ण न करता काही काम प्रलंबित ठेवल्याने याबाबत श्री महालक्ष्मी मच्छिमार सहकारी सोसायटीचे चेअरमन विजय गिदी यांनी हरकत घेतली आहे. येत्या काही दिवसात जर या साकवाचे काम परिपूर्ण न केल्यास राजपुरी खोकरी मार्ग कायमस्वरूपी बंद करण्यात येईल, असा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

मुरुड सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना रीतसर निवेदनाने कल्पना देण्यात आली



आहे. हा मार्ग बंद केल्यास राजपुरी, माझेरी व मुरुडमधील नागरिकांना रोहा येथे जाण्यासाठी जवळचा मार्ग बंद पडणार आहे. त्यामुळे असंख्य प्रवासी वर्गाची कुचंबणा होणार आहे. याबाबत मुरुड सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित कार्यवाही करून पूर्तता करावी, अशी प्रवासी वर्गाकडून मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनात विजय गिदी यांनी मागणी केली आहे की, साकवाचे बांधकाम झाल्यानंतर ठेकेदाराने मुख्य पाणी जाण्याच्या मार्गावर दगड, माती, रॅबीट तसेच ठेवल्यामुळे पाणी साचून रहात आहे. त्यामुळे या भागात घाणीचे साम्राज्य तयार झाले आहेत. त्यापासून •> पान २ वर

## पशुसंवर्धन विभागाचा स्तुत्य उपक्रम | शंभर टक्के अनुदानातून बियाणे उपलब्ध

# जनावरांना मिळणार पोषक चारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दुधाळ जनावरांना पोषक आहार उपलब्ध व्हावा यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने वैरण उत्पादन योजनेंतर्गत महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. या योजनेच्या माध्यमातून ज्वारी, बाजरी तसेच हायब्रीड मका पिकांची लागवड करण्यात येत असून, जिल्ह्यातील १ हजार ५६२ लाभार्थ्यांना प्रत्येकी चार किलोप्रमाणे एकूण ६ हजार २४८ किलो बियाण्यांचे वाटप करण्यात आले आहे. शंभर टक्के अनुदानातून ही बियाणे उपलब्ध करून देण्यात आली असून, यामुळे लाखो दुधाळ जनावरांना पोषक हिरवा चारा मिळणार आहे.

रायगड जिल्ह्यात भातशेतीबरोबरच पशुपालन हा शेतकऱ्यांचा महत्त्वाचा व्यवसाय बनत चालला आहे. अनेक शेतकरी पोल्ट्री, बकरीपालन, मेंढीपालन तसेच गायी-म्हशींचे पालन करून आपली आर्थिक घडी मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जिल्ह्यात सुमारे ६२ हजार २२५ म्हशी, ९० हजार १८८ बकऱ्या, २ हजार २०३ मेंढ्या आणि १ लाख ७६ हजार ९०६ गायींची नोंद असून, दूध विक्रीतून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळत आहे. मात्र, दुधाळ जनावरांना योग्य आणि पोषक



आहार न मिळाल्यास दूध उत्पादन घटते आणि त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. खर्च वाढतो आणि उत्पन्न कमी होते, अशी स्थिती निर्माण होते. ही समस्या ओळखून पशुसंवर्धन विभागाने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून २५ लाख रुपयांच्या निधीतून वैरण उत्पादन योजना सुरू केली आहे.

या योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जमिनीत हायब्रीड मका पिकाची लागवड करता यावी, यासाठी महाबीज कंपनीमार्फत बियाणे वितरीत करण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यातील दीड हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात या पिकाची लागवड केली आहे. उन्हाळ्यात गवत सुकल्याने ओल्या चाऱ्याची टंचाई निर्माण होते. ही समस्या दूर करण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. स्वतःच्या शेतातच पोषक वैरण तयार केल्याने शेतकऱ्यांची चाऱ्यासाठी होणारी वणवण थांबणार असून, दुधाळ जनावरांच्या उत्पादनक्षमतेतही वाढ होण्याची शक्यता आहे. पशुसंवर्धन विभागाच्या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

**पोषक आहारावर दृष्टीक्षेप**

| तालुके | शेतकरी संख्या | वैरण संख्या |
|---|---|---|
| तळा | ४५ | १८० |
| उरण | ६० | २४० |
| म्हसळा | ६० | २४० |
| मुरुड | ७५ | ३०० |
| अलिबाग | ९० | ३६० |
| खालापूर | ९० | ३६० |
| श्रीवर्धन | ९० | ३६० |
| पाली | ९० | ३६० |
| पोलादपूर | ९० | ३६० |
| पेण | १०० | ४०० |
| रोहा | १३० | ५२० |
| पनवेल | १४० | ५६० |
| माणगाव | १६० | ६४० |
| महाड | १७० | ६८८ |
| कर्जत | १७२ | ६८८ |
| एकूण | १,५६२ | ६,२४८ |

## गारमाळ परिसरात बिबट्याची दहशत

- मॉर्निंगवॉकला येणाऱ्यांचे धाबे दणाणले
- वनविभागाचे सतर्कतेचे आवाहन



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली परिसरातील घाटमाथ्यावर असलेल्या गारमाळच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर आहे, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

शनिवारी सकाळी खोपोलीतील दोन नागरिक मॉर्निंगवॉकसाठी घाटमाथ्यावर असलेल्या गारमाळच्या जंगलातील रस्त्याने चालत असताना बिबट्याने त्याच्या पुढ्यातच उडी मारल्याने त्यांची धावाधाव सुरु झाली. बिबट्याला घाबरून पळताना त्यातील एक जण पडल्याने जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे घाटमाथ्यावर असलेल्या गारमाळ परिसरात मॉर्निंगवॉकसाठी येणाऱ्यांचेही धाबे दणाणले असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

गारमाळच्या परिसरात मोठे आणि घनदाट जंगल असून येथे अनेक जंगली प्राणी आहेत. त्यातच गेल्या अनेक दिवसापासून बिबट्या गेल्या अनेक दिवसापासून या परिसरात वावरत आहे, तर तो आता लोकवस्ती जवळ वावरत असून गारमाळगावाजवळ मुख्य रस्त्यावरही वावरत असताना अनेक ग्रामस्थांना दिसला आहे. तर, दोन दिवसापूर्वी गारमाळच्या रस्त्यावर चक्क दहा मिनिटे तळ ठोकून बिबट्या बसला होता. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. तर येथील ग्रामस्थांच्या असणाऱ्या गाई- म्हशीच्या वासरांचा आणि पारडांचा फडशा पाडत असल्याने ग्रामस्थांचे मोठे नुकसान होत आहे.

या घटनेची वनविभागाने गंभीर दखल घेत ग्रामस्थांनी सतर्क राहून लहान मुलांची आणि पाळीव जनावरांची काळजी घेण्याचे आवाहन खोपोली वनविभागाचे अधिकारी भगवान दळवी यांनी केले आहे.

## निवडक



### चराईखुर्दला आयएसओ मानांकन

**तळा :** तालुक्यातील चरई खुर्द ग्रामपंचायतीने उत्कृष्ट प्रशासन, पारदर्शक कामकाज आणि नागरिकाभिमुख सेवा यांमुळे मानांकन प्राप्त केले असून अशी कामगिरी करणारी ती तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे. या मानांकनामुळे गावाच्या विकासकामांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यपद्धतीबाबत सकारात्मक संदेश गेला आहे. गेल्या काही वर्षांत चरइखुर्द ग्रामपंचायत सरपंच प्रवीण अंबारले आणि त्यांचे सर्व ग्रामपंचायत सदस्य यांनी स्वच्छता,पाणीपुरवठा, डिजिटल नोंदवही, कर संकलन, ग्रामसभा आयोजन आणि नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण यावर विशेष भर दिला. प्रशासनातील पारदर्शकता राखण्यासाठी ऑनलाइन नोंदी, नियमित अहवाल व लेखापरीक्षण यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. या सर्व निकषांची तपासणी झाल्यानंतर मानांकन मंजूर करण्यात आले. रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले यांच्या उपस्थितीत हे मानांकन चरइ खुर्द ग्रामपंचायतीस प्रदान करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, विस्तार अधिकारी पुष्पा नेरकर, सरपंच प्रवीण अंबारले, उपसरपंच अजय सावंत, लक्ष्मण भोईर, सुभाष खिडबीडे, रश्मी अंबारले, हर्षदा भोईर, प्रतीक्षा सकपाळ, ग्रांमपंचायत अधिकारी राजेश खैरे आदी मान्यवर उपस्थित होते. मानांकनामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजाला अधिक विश्वासार्हता मिळाली आहे.

### किल्ले रायगड येथे शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन

**रायगड :** प्रतिवर्षीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची ३४६ वी पुण्यतिथी, गुरुवारी (दि.२) किल्ले रायगड येथे साजरी करण्यात येत असून छत्रपतींना आदरांजली वाहण्याकरिता श्री शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष त्रिंबक पुरोहित यांनी केले आहे. बुधवारी (दि.१) सायं. ७.०० वा.,राजदरबारात सांस्कृतिक कार्यक्रम, मान्यवरांच्या मुलाखती व शाहिरी कार्यक्रमही रात्र शाहिरांची तसेच रात्रौ १० वाजता श्री जगदिश्वर मंदिरात हरिजागर होणार आहे. गुरुवारी (दि.२) पहाटे ५.०० वा. श्री जगदिश्वर पुजा सकाळी ६.०० वा. हनुमान जयंती, सकाळी ८.०० वा. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची पूजा, सकाळी ९.०० वा. राजदरबार येथे श्री शिव प्रतिमा पूजन, छत्रपती शिवरायांना आदरांजली, ११.०० वा. छत्रपतींच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक राजदरबार ते श्री शिवसमाधी, दुपारी १२:३० वा. छत्रपतींना मानवंदना त्यानंतर शिवभक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. रायगडावर जे येतील त्यांनी चढत आणि उतरत असता प्रातः स्मरणीय छत्रपती शिवरायांना आठवावे, जीवित तृणवत मानावे. आपण या महान देशाच्या महान परंपरेतले एक सैनिक आहोत हे ध्यानी घ्यावे. रायगडावरील प्रत्येक पाषाणखण्ड शिवचरित्राची स्त्रोत्र गात आहे. येथील प्रत्येक वृक्ष आणि लता स्वातंत्र्यवीरांची जयगीते गात आहेत. या अवघ्या वीरांचा ते मुकुटमणी छत्रपती शिवरायांनी तर अंतीम शयन इथेच केले आहे. त्यांचे अंतीम श्वास याच वातावरणाशी, मातीशी एकजीव झाला आहे. छत्रपतींच्या पदस्पर्शाने पवित्र झालेली गडावरची माती कपाळी लावावी आणि भारतमाता, हिंदूधर्म रक्षणाकरिता व उन्नती करिता संकल्प करावा हेच मागणे.किल्ले रायगडावरील श्री शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमात अनेक थोर व्यक्तींनी हजर राहून मानवंदना दिली आहे. यात भालजी पेंढारकर, ले जन. शंकरराव थोरात, एकनाथ रानडे, प्रा. शिवाजी भोसले, राजमाता विजयाराजे शिंदे, शरद पवार, सरसंघचालक बाळासाहेब देवरस, जगजीवनराम, मोहन धारिया, बाबासाहेब पुरंदरे, गो. नि. दांडेकर, दत्तोपंत ठेंगडी, मोरोपंत पिंगळे, इंदिरा गांधी, ग्यानी झैलसिंग, जयंतराव टिळक, सरसंघचालक रज्जूभैया, सरसंघचालक सुदर्शन, शंकरराव चव्हाण, महावीर चक्र विजेते सु. मेजर कृष्णाजी सोनावणे, अशोक सिंघल, आचार्य धर्मेंद्र, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मनोहर पर्रिकर, देवेंद्र फडणवीस, सरसंघचालक मोहन भागवत, स्वामी नरेंद्रमहाराज, ज्योतिरादित्य शिंदे, अमित शहा यांचा समावेश आहे.

# धुराच्या लोटाने हालमधील वातावरण दूषित

## नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्‍न ऐरणीवर ;भंगार मालकावर कारवाईची स्थानिकांची मागणी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापुर तालुक्यात ग्रामीण भागासह मुंबई पुणे जुन्या महामार्गालगत असंख्य भंगार व्यवसायिक अवैधपणे राजरोसपणे व्यवसाय करून लाखोचा पैसा कमवत असतात. मात्र हा पैसा कमवत असताना नागरिकांच्या आरोग्याशी नेहमीच खेळत असल्याचा प्रत्यय अनेक ठिकाणी पाहायला मिळत असताना त्याचाच प्रत्यय नुकताच मुंबई पुणे जुन्या महामार्गालगत असणाऱ्या हाल गावाजवळ पाहायला मिळाला. या आगीने परिसरात धुराचे लोट पसरल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले होते.

ही आग विझवण्यासाठी मोठे शर्थीचे प्रयत्न करत जवळपास पाच ते सहा फायर ब्रिगेड टीमच्या मदतीने आग विझवण्यात आली. परंतु त्या आगीचे केमिकल युक्त धुराचे लोट गेल्या ५ दिवस परिसरात कायम असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आग लागली त्या ठिकाणच्या परिसराच्या बाजूलाच नामांकित स्कूल असल्याने या धुराचा त्रास विद्यार्थ्यांना झाल्याचे दिसून आले. त्यामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या भंगार व्यवसायिकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

ग्रामीण भागासह खोपोली शहरात अनेक भंगार व्यवसायिकांची लहान मोठी दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली आहेत.

या भंगार दुकानात ज्वलनशील पदार्थ असल्याने अनेक वेळा आगीच्या घटना घडत असतात, त्याचा नाहक त्रास परिसरातील नागरिकांना होत असल्याने या भंगार व्यवसायिकांना कोणाचा वरदहस्त आहे, कोणाकडून परवानगी घेतली, असा सवाल उपस्थित होत आहे.

मार्च महिना असल्याने उष्म्याचा जोर अधिक असताना सोमवारी १६ मार्च दुपारीच्या सुमारास मुंबई-पुणे जुन्या महामार्गाला लागूनच असणाऱ्या खोपोली नगरपालिका हद्दीतील हाल गावच्या परिसरात भंगाराच्या दुकानाला भीषण आग लागली. या आगीने भयानक रूप धारण केल्याने ही आग आटोक्यात आणण्यासाठी खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण व पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली नगरपालिका, टाटा स्टील, अलाना कंपनी, जेएसडब्ल्यूसह अन्य अग्निशमक दलाची वाहने ही आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न हेल्फ फाउंडेशनच्या मदतीने करीत जवळपास पाच ते सहा तासाच्या अथक प्रयत्नातून आग विझवण्यात यश आले.

परंतु आग विझल्यानंतर परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला. मात्र यानंतर येथील नागरिकांना अधिक त्रास होतो आहे. हा धूर अजून थांबता थांबेना झाल्याने भंगार व्यवसायिकाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या भंगार दुकानात असे कोणते केमिकल व प्लास्टिक होते की, आग विझून ही धुराचे लोट ५ दिवस अजून ही परिसरात कायम असल्याने या धुरामुळे नागरिकांना श्वसनाचे त्रास होत आहे. त्यामुळे भंगार दुकानावर प्रशासन कोणती कारवाई करते याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

### वडघरमध्ये आठवडी बाजारावर बंदी

**पनवेल :** वडघर ग्राम पंचायतीने गावातील आठवडी बाजार व फेरीवाल्यांवर बंदी घालण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने लावलेल्या जाहीर सूचनेनुसार, भरविण्यात येणारा आठवडी बाजार तसेच अनधिकृत फेरीवाले यामुळे वाहतूक कोंडी, अडथळे व विविध गैरसोयी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर दिनांक ०५ मार्च रोजी पनवेल शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत व स्थानिक ग्रामस्थ यांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार वडघर हद्दीतील सर्व आठवडी बाजार तात्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## मोफत आरोग्य शिबीर संपन्न

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

ग्रामपंचायत तुराडे व अष्टविनायक हॉस्पिटल मोहपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर राबविण्यात आले.



यावेळी आलेल्या रुग्णांचे बी.पी. शुगर आणि वजन करून ई.सी.जी. तपासणी घेण्यात आल्या. या तपासणीतून काही मोठ्या प्रकारचे आजार असल्यास त्या प्रकारचे शस्त्रक्रिया किंवा पुढील उपचार व शासनाच्या विविध योजनांच्याद्वारे मोफत उपचार करण्यासाठी डॉक्टरांकडून मार्गदर्शन करण्यात आले. आणि ही सुविधा अष्टविनायक हॉस्पिटल मोहपाडा येथे हे सुरू करण्यात आल्याचे यावेळी डॉक्टरांनी आलेल्या रुग्णांना माहिती दिली. यावेळी सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, उपसरपंच लीना मयूर ठाकूर, मालती वाघमारे, रिया प्रदीप माळी, पूजा चंद्रकांत भोईर, ग्रामपंचायत अधिकारी अस्मिता मोकल आणि इतर सदस्य उपस्थित होते.

तुराडे ग्रामपंचायत हद्दीमधील लोकांसाठी विविध योजनांची माहिती देऊन त्यांना विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी सहकार्य केले जाते. त्यामुळे शिबिरासाठी आलेल्या रुग्णांमध्ये समाधान व्यक्त केले जात होते.

यावेळी ३८ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. अष्टविनायक हॉस्पिटलचे डॉ. विशाल पाटील, डॉ. बालाजी जानराव, डॉ. आशिष कदम, नर्स शामली म्हात्रे, अलिषा मुलानी, साई पवार, मनीष गायकवाड, प्रदिप माळी, विश्वनाथ गायकवाड आदी उपस्थित होते.

### करदात्यांसाठी अभय योजना

**तळा :** तळा शहरातील घरपट्टी भरणाऱ्या करदात्यांसाठी तळा नगरपंचायतीतर्फे अभय योजना सुरू करण्यात आली आहे. ज्या नागरिकांची ३१ मार्च २०२६ अखेरीपर्यंतची नगरपंचायतीला देय असलेली घरपट्टी अद्यापपर्यंत भरणा केलेली नाही, अशा करदात्यांकरिता तळा नगरपंचायत शासनाची अभय योजना राबवित आहे. या योजने अंतर्गत करदात्यांनी त्यांनी भरावयाची कराच्या एकूण रक्कमेची एकरकमी भरणा केल्यास त्यांना दिनांक १९ मे २०२५ अखेरपर्यंत लागू झालेल्या २ टक्के शास्ती रक्कमेमध्ये ५० टक्के पर्यंत सूट मिळू शकणार आहे.

## रामनवमीला शिर्डीत विशाल साईभक्त संमेलन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

राम नवमीच्या पावन पार्श्वभूमीवर नानक साई फाऊंडेशनतर्फे शिर्डी येथे २५ मार्च रोजी भव्य साई भक्त संमेलन आयोजित करण्यात आले असून या संमेलनाची जय्यत तयारी सुरू आहे.

श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी,श्री संत कवी दासगणू महाराज साई भक्त मंडळ उमरी (गोरठे),साईं मानव सेवा ट्रस्ट, साईं धाम ट्रस्ट यांच्या सहकार्याने हे भव्य संमेलन पार पडणार आहे. हे संमेलन सर्व साई भक्तांसाठी खुले असून देशभरातील साई भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख पंढरीनाथ बोकारे (९८२३२६००७३) यांनी केले आहे. या संमेलनास रायगडातून हजारो साईभक्त सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

याबरोबरच या संमेलनासाठी मुंबई, महाराष्ट्र, झारखंड, दिल्ली, हरियाणा, पंजाब, मध्य प्रदेश या राज्यांतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री गोरक्ष गाडीलकर हे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

या विशाल साई भक्त संमेलनात भजन, पालखी मिरवणूक तसेच साई विचारांची देवाणघेवाण असे विविध भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

### उरण नगरपालिकेत तक्रार पेटीचे अनावरण

**उरण । प्रतिनि ।**

उरण नगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या विविध नागरी समस्यांचे वेळेत व पारदर्शक निवारण व्हावे या उद्देशाने नगरपालिका कार्यालयात तक्रार पेटी बसविण्याची मागणी करण्यात आली होती. ही मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघ यांच्याकडून नगराध्यक्षा भावना घाणेकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली होती. त्या मागणीची दखल घेत उरण नगरपालिकेच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या हस्ते तक्रार पेटीचे अनावरण उरण नगरपालिका कार्यालयात करण्यात आले.

## कर्जत तालुक्यातील ठेकेदार आर्थिक संकटात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

शासनाच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांच्या टेंडर चे पैसे ठेकेदारांना वेळेवर मिळत नाहीत.त्यामुळे ठेकेदार आर्थिक संकटात सापडले असून ठेकेदारांनी उपोषण करण्याचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला आहे.त्यामुळे या आर्थिक संकटावर मात करावी या मागणीसाठी कर्जत ठेकेदार संघटनेने कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन आर्थिक कोंडीतून सोडविण्याची मागणी केली आहे.



तालुक्यातील ठेकेदारांनी केलेल्या विकास कामांची शेकडो कोटींची बिले मागील तीन वर्षापासुन प्रलंबित आहेंत. आदिवासी उप योजना अंतर्गत साधारणतः एकशे पंचवीस कोटी.ट्रायबल मधील कामांची एकशे नव्वद कोटी तसेच विविध हेड खाली साधारणतः पन्नास कोटी इतक्या रकमेची बिले प्रलंबित असून मागील दीड वर्षात ठेकेदारांना एकही रुपयाचे बील मिळाले नाही. त्या मुळे ठेकेदारांची आर्थिक स्तिथी खालवली आहे. बँका मधून घेतलेल्या कर्जाचे व्याज वाढत आहे. मटेरियल सप्लायर्स यांनी उधारी साठी तगादा लावला आहे. त्यामुळे मार्च महिन्यात केलेल्या कामाची बिले मिळाली नाहीत तर ठेकेदारांना आत्महत्येशिवाय पर्याय नाही.

ही सर्व बिले दिनांक २४ मार्च २०२६ पर्यंत मिळाली नाहीत तर कर्जत तालुका ठेकेदार संघटनेचे अध्यक्ष राहुल डाळिंबकर हे गुरुवार दिनांक २५ मार्च रोजी कर्जत येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाचे आवारात आमरण उपोषणास बसणार आहेत.

त्यांच्या सोबत इतर सदस्य लाक्षणिक उपोषण करणार आहेंत. कर्जत मतदार संघांचे आमदार महेंद्र थोरवे यांनी या बाबत वैयक्तिक लक्ष घालून ठेकेदारांना निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे. या करिता आमदारांना निवेदन दिले.

### भुयारी मार्गातील खड्डे अपघाताला निमंत्रण

**पनवेल :** नवीन पनवेल, विचुंबे ते पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या भुयारी मार्गात मोठा खड्डा झाल्याने अनेक अपघात होत आहेत. त्यामुळे या भुयारी मार्गातील खड्डा बुजवण्याची मागणी प्रवासी करत आहेत. तक्का पनवेल ते नवीन पनवेल येथून पनवेलकडे जाणाऱ्या भुयारी मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. नवीन पनवेल पासून पनवेलकडे जाणाऱ्या भुयारी मार्गात मोठा खड्डा झाल्याने या खड्ड्यात वाहने आदळत आहेत. काहींच्या दुचाकी तर या खड्ड्यांमुळे खाली कोसळल्या आहेत. त्यामुळे मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून

### पाण्यासाठी वणवण थांबेना!

आणि त्रास सहन करणाऱ्या महिलांचे हाल पाहूनही प्रशासन गप्प असल्याने संताप अधिकच वाढत आहे. तात्काळ ठोस उपाययोजना करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

### डिझेल दरवाढीचा मच्छिमारांना फटका

द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. ९ मे २०२५ च्या शासन निर्णयानुसार मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मच्छिमारांनाही इंधनदरात सवलत मिळावी, असे मच्छिमारांनी सांगितले. सरकारने ही दरातील तफावत लवकर दूर केली नाही, तर वाढत्या इंधन खर्चामुळे अनेक मच्छिमारांना समुद्रात जाणे परवडणार नाही. त्यामुळे मासेमारी व्यवसाय ठप्प होण्याची शक्यता असल्याचा इशाराही मच्छिमारांनी दिला आहे.

### राजपुरी खोकरी रस्ता बंद कराही

नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे समुद्राच्या बाजुला खोदकाम करून दगड, माती तशीच ठेवली आहे. त्यामुळे मच्छिमारांच्या नौका पाण्याच्यावर किंवा समुद्राच्या आत लोटताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे मच्छिमारांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आता आगामी काळात म्हणजेच एप्रिल महिन्यात हनुमान जयंती, श्री गणेश उत्सवाचे कार्यक्रम, गावातील सामुदायिक लग्न सोहळ्यातील साखरपुडे, सामुदायिक लग्नातील हळदी कार्यक्रम, सामुदायिक विवाह सोहळा, असे कार्यक्रम सपन्न होणार असून यावेळी राजपुरी कोळीवाडा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे क्रमप्राप्त आहे.

तरी येत्या आठ दिवसाच्या साकवाचे राहिलेले काम व मुख्य प्रवाहाच्या समोरील दगड, माती, रॅबीट उचलून त्याठिकाणी काँक्रिटीकरण करण्यात यावे. जर का सदर काम वेळेत झाले नाही तर रहदारी रस्ता दोन्ही बाजूंनी बंद करण्यात येईल, असा इशारा चेअरमन विजय गिदी यांनी सार्वजनिक बांधकाम मुरुड यांना दिला आहे.

### महिला सरपंचाला मारण्याची धमकी

कोण, असे बोलून तुमची अडीच वर्षात खूप नाटके चालले आहेत. आता तुम्हाला बघतो अशी धमकी दिली. यानंतर खोदकाम करणाऱ्याने महिला सरपंचांना शिवीगाळी व दमदाटी केली, तसेच तुम्ही कोण सरपंच मी नाही कोणाला घाबरत असे बोलून सोबत आणलेला कोयता दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणाबाबत सरपंचांनी पोलादपूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार अर्ज दिला. पोलादपूर पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याने महिला सरपंचांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एकीकडे शासन महिलांसाठी मजबूत कायदा बनवीत असून दुसरीकडे महिला सरपंचाला जीवे ठार मारण्याची धमकी दिली जाते. सदर प्रकरणाबाबत पोलादपूर पोलिसांवर कोणाचा दबाव होता का तसेच धमकी देणारा सत्तेतील राजकीय पक्षाचा पदाधिकारी आहे का हे पाहणे आता गरजेचं असून महिला सरपंचाला योग्य तो न्याय मिळावा, अशी मागणी लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे.

### महामार्गावर भीषण अपघात

अहमदाबाद महामार्गावरील ढेकाळे येथील वाघोबा खिंड परिसरात शनिवारी सायंकाळी भीषण अपघात घडला. अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील तिघांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास मुंबई वाहिनीवर घडला. दुचाकीवरील तिघे मंबईच्या दिशेने जात असताना वाघोबा खिंड परिसरात अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडकेनंतर तिघांनाही वाहनाने चिरडल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला. मनोर पोलिसांनी घटनेची माहिती मिळताच तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन मनोर येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहेत. सध्या मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून, त्यांच्या नातेवाइकांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, अपघात करून पसार झालेल्या वाहनाचा शोध पोलिसांकडून सुरू आहे.

### हॉटेल, उपहारगृहांना २० टक्के गॅस पुरवठा

त्या ठिकाणी रास्तभाव दुकान चालविणाऱ्या दुकानदारांना किरकोळ केरोसिन परवानाधारक म्हणून मान्यता देऊन परवाना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. २० मार्च २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासनपत्रान्वये या संदर्भातील कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व निर्णयांमुळे राज्यातील इंधन पुरवठा व्यवस्थेला काही प्रमाणात गती मिळण्याची अपेक्षा असून, विशेषतः खाद्यव्यवसाय आणि लघुउद्योगांना याचा मोठा फायदा होणार असल्याचे मानले जात आहे.

### दोनशे रुपयांत जमिनींचे पोटहिस्से

क्षेत्रासाठी ३००० रुपये मोजणी फी आकारली जात आहे. त्यापुढील स्लॅबसाठी म्हणजे दोन हेक्टरनंतरच्या क्षेत्राच्या पुढील हिश्शाच्या मोजणीसाठी १००० रुपये फी घेतली जात आहे. परंतु, नुकताच जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख राज्य संचालक यांच्याकडून मोजणी फीमध्ये सवलत देण्याचे आदेश काढला आहे. याच्या अंमलबजावणीचे निर्देश जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयांना दिले आहेत. त्यानुसार आता जमिनींच्या पोटहिश्श्यांच्या मोजणीसाठी फक्त दोनशे रुपये फी घेतली जाणार आहे.

यासाठी एकत्र कुटुंबातील सदस्यांच्या शेतजमिनीचा मुद्रांक शुल्क विभागाचा नोंदणीकृत वाटप दस्त किंवा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ नुसार तहसीलदारांचा आदेश सादर करावा लागणार आहे. त्याचबरोबर सातबारा व नकाशे अद्ययावत होण्यास मदत होणार आहे. नकाशामध्ये मोजणीद्वारे वेळीच हद्दी, क्षेत्र, चतुःसीमा यांच्या मोजमापाच्या नोंदी घेतल्याने भविष्यातील क्षेत्र व हद्दीबाबतचे वाद कमी होण्यास मदत होईल.जमिनींच्या पोट हिस्सा मोजणी फीमध्ये सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोजणी फी साठीचे पैसे वाचणार आहेत. त्याचबरोबर या सवलतीमुळे प्रकरणांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे अभिलेख विभागाकडील सातबारा व नकाशे अद्ययावत होतील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

जमीन पोट हिस्सा मोजणीची प्रकरणे अर्ज प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांना निकाली काढावा लागणार आहेत. त्याबाबतचे आदेश जमाबंदी आयुक्त व राज्य संचालक, भूमी अभिलेख विभाग यांच्याकडून देण्यात आले आहेत.संमतीने पोट हिस्सा मोजणीमध्येही सवलतसंमतीने पोट हिस्सा मोजणी व दिवाणी न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात येणाऱ्या वाटप मोजणी फी मध्येही सवलत देण्यात आली आहे. त्यांनाही मोजणीसाठी फक्त दोनशे रुपयेच द्यावे लागणार आहेत.

### संघटनेची कार्यकारिणी जाहीर

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुका सेवानिवृत्त कर्मचारी संघटना ( संलग्न) रायगड जिल्हा सेवानिवृत्तांची संघटना तालुका शाखेची नवनिर्वाचित संघटना कार्यकारिणीची निवड भानू मंचेकर यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मारुती शिर्के, जनार्दन वडके, पद्मा गाडगीळ, सविता जोशी, नामदेव तांबड आदी उपस्थित होते. यावेळी अध्यक्षपदी अनंत वारे यांचे नाव आले. त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली तर सचिवपदी दिपक ठाकूर, उपाध्यक्षपदी हसनमिया परदेशी, सहसचिव अरविंद जंगम, खजिनदार मनोहर चव्हाण, सदस्य गोविंद ठाकर, परशुराम गायकवाड, नामदेव भौड, जनाबाई पाटील, तनुजा मुळे, कल्पना गायकवाड, शांताराम नटे, दयानंद जानराव, प्रसिद्धी प्रमुख जनार्दन वडके या प्रमाणे नवनिर्वाचित कार्यकारिणी बिनविरोध निवड झाली. यावेळी कार्यकारिणीचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष अनंत वारे यांनी अध्यक्ष भानू मंचेकर व सचिव जनार्दन वडके कार्यकारिणी यांनी जे संघटनेसाठी काम केले आहे, त्यांची प्रेरणा घेऊन आम्ही त्यांचे मार्गदर्शन घेऊन काम करण्याचा प्रयत्न करून अडीअडचणी सोडविण्यासाठी सदैव तयार राहू.तसेच संघटना राबवित असलेल्या उपक्रमांपेक्षा अधिक उपक्रम राबविणार आहोत, असे सांगितले.

## चिरनेर येथे पशूसंवर्धन विभागाचा मेळावा संपन्न

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणतालुकापशुसंवर्धनविभागातर्फे चिरनेर येथे रहिती, प्रशिक्षण व जनसंपर्क मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

विविध शासकीय योजना राबवून पशु पक्षी संवर्धनास चालना मिळण्यासाठी अस्कॅड योजने अंतर्गत विविध योजनांची माहिती शेतकरी वर्गास मिळावी म्हणून उरण तालुका पशुसंवर्धन विभागातर्फे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पशुपालनामध्ये येणाऱ्या समस्या व त्यावरील उपाययोजना तसेच गाई, म्हशी, शेळ्या पालन करताना त्यांचे दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी कोणते खाद्य तसेच औषधे द्यावीत याची माहिती पशुपालकांना दिली.

**नोटीस**

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) पुजा प्रसाद म्हात्रे, २) संजय नंदकुमार सराफ, ३) हर्षद नंदकुमार सराफ, ४) राजेंद्र श्रीधर पिसाट, यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| रेवदंडा | ६८/३/१/१ | १-२६-०० | १२.६० |
| ता. अलिबाग | ६८/३/२/२/अ | १-३९-०० | १३.९० |

वर नमुद बिनशेती जमिन मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा हद्दीतील मालमत्ता क्र. ५७३ अ, क्षेत्र २१६५ चौ.फुट घर मिळकत व १५० चौ. फुट दुकान गाळा या मिळकतींबाबत

दिनांक: १९/०३/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

# मुरुड समुद्रकिनारा पर्यटकांनी बहरला



| आगरदांडा-मुरूड जंजिरा | प्रतिनिधी |

मुरूड समुद्रकिनारी पर्यटकांची रेलचेल सुरू झाली असून दोन महिन्यांपासून पर्यटकांच्या प्रतिक्षेत असणाऱ्या मुरूडकरांची चिंता आता मिटली आहे. सध्या मुरुड शहरात सकाळी थंडी तर दुपारी गरम असे वातावरण असल्याने रविवारी (दि.२२) दुपारी पर्यटकांनी मुरुडच्या किनाऱ्यावर येणे पसंत केले. त्याचबरोबर पर्यटकांनी ताज्या मासळीवर ताव मारला असून सुकी मच्छी खरेदी करण्यावर भर दिला. त्यामुळे पर्यटनावर अवलंबुन असणारे व्यावसायिक व मासळी विक्रेत्यांच्या चेहरा आनंदाने फुलला आहे.

गेल्या दोन महिन्यांपासुन दहावी व बारावी बोर्डाच्या तसेच इतर वर्गातील मुलांच्या परिक्षा सुरू होत्या. त्यामुळे बहुतांश पर्यटकांनी रायगड जिल्ह्याकडे पाठ फिरवली होती. मात्र, आता परिक्षा संपल्याने पर्यटकांची रेलचले जिल्ह्यात सर्वत्र दिसून येत आहे. मुरूड तालुक्यातील जंजिरा किल्ल्यासह मुरुड पासून जवळच असणारे गारंबी धारण, कुडे मांदाड लेणी, खोकरी व दत्तमंदिर पाहण्यासाठी पर्यटक दरवर्षी मोठ्या संख्येने मुरूडमध्ये हजेरी लावत असतात. या पर्यटन स्थळावर स्वछता करून खाण्यापिण्याचे स्टॉल लावण्यात आले आहेत. नुकत्याच विद्यार्थ्यांच्या परिक्षा संपल्याने संपुर्ण राज्यभरातील शेकडो पर्यटकांनी आपला मोर्चा मुरूडकडे वळवला आहे. मुरूडमधील वातावरण काही प्रमाणात बिघडले असून सकाळी थंडी तर दुपारी प्रचंड गर्मी असते. मात्र, असे असतानाही पर्यटकांनी दुपारच्या वेळी मुरूड व काशीद समुद्रकिनारी पाण्यात पोहण्याचा आनंद लुटला. तर, काही पर्यटकांनी घोडागाडी, घोडेस्वारी व जलक्रीडाचा आनंद घेतला. त्यानंतर पर्यटकांनी येथील समुद्रकिनारी असलेल्या हॉटेलमध्ये तसेच खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर जाऊन मेजवानीचा देखील आनंद घेतला. विशेष करून पर्यटकांनी मासळीवर ताव मारला. त्यामुळे येथील व्यावसायिकांचे चेहरे आनंदाने फुलले आहेत.



● मुरुड किनाऱ्यावर रविवार सुंदर संध्याकाळचा सुर्यास्तवेळी सोनेरी लाटामध्ये आनंद घेताना पर्यटक. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

### ताज्या मासळीवर ताव

सध्या समुद्रातील वातावरण खराब असल्याने मासेमारी कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे मासळीचे भाव काही प्रमाणात वधारले आहेत. असे असतानाही पर्यटकांनी ताजी मासळी खाण्याला पसंती दर्शवली आहे. काही पर्यटकांनी स्वतः मासळी बाजारात जाऊन ताजी मासळी खरेदी केली. तसेच, पावसाळ्यासाठी मोठ्या प्रमाणात सुकी मच्छी देखील खरेदी केली. त्यामुळे मासळी विक्रेत्यांचा चेहऱ्यावर देखील मोठ्या प्रमाणात आनंद दिसत आहे.

### उन्हाळी सुट्टीसाठी मुरूडकर सज्ज

नुकत्याच विद्यार्थ्यांच्या परिक्षा संपल्याने आता उन्हाळी सुट्टी सुरू झाल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांनी शनिवार-रविविरी आपला मोर्चा मुरूडकडे वळवला आहे. हा पर्यटनाचा हंगाम पुढील दोन महिने तरी असाच चालू राहणार आहे. त्यामुळे उन्हाळी सुट्टीसाठी मुरूडमधील हॉटेल, रिसॉर्ट, कॉटेजेस, स्टॉलधारक व पर्यटनावर अवलंबून असणारे इतर छोटे मोठे व्यावसायिक सज्ज झाले आहेत. त्याचबरोबर घोडेस्वारी, घोडागाडी, मोटार बाईक व जलक्रीडा यामुळे मुरूडमधील समुद्रकिनारे बहरले आहेत. त्याचबरोबर मुरूड समुद्रकिनारी पालिकेचे स्वच्छता कर्मचारी दिवसातून ३ वेळा साफसफाई करत असतात.

> कोरोना काळापासून मुरूडमधील हॉटेल व्यवसाय डबघाईला आला होता. यंदाच्या उन्हाळी सुट्टीत हॉटेलमध्ये पर्यटकांची बुकिंग चांगली आहे. पर्यटकांनी कायम असेच मुरुडला यावे, आम्ही त्यांना ऊत्तम सेवा देऊ. त्याचबरोबर हॉटेल भाडे देखील योग्य दरात घेऊ.
> – किशोर धमसकर, हॉटेल व्यावसायिक, मुरूड

> मुरूड उन्हाळी सुट्ट्यांसाठी सज्ज आहे. पिण्याचे पाणी, शहरातील रस्ते व समुद्रकिनारी स्वछता याकडे जातीने लक्ष दिल्याने पर्यटकांना त्रास होणार नाही. पर्यटकांनी समुद्रात जाताना भरती ओहोटीचे भान ठेऊन लाटांचा सुरक्षित आनंद घ्यावा.
> –सचिन बच्छाव, मुख्यअधकारी, मुरुड नगरपरिषद

## निवडक



### उद्यम विकास प्रकल्पाअंतर्गत प्रशिक्षण

**रसायनी :** महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत प्रगती लोकसंचलीत साधन केंद्र व नवतेजस्विनी ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत कायदासाथी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती सिएमआरसीच्या व्यवस्थापक पदमावती गायकवाड यांनी केले. या प्रशिक्षणात तालुका विधी सेवा समिती लिपिक कोर्टचे योगेंद्र यनम, पॅनल वरील ॲड. भारती ढाकवळ, ॲड. प्रमिला चव्हाण, माविम रायगडचे एएमओ प्रसाद पिंपरकर, महिला व बाल सरंक्षण अधिकारी प्रमोद वाघ यांनी महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन केले. यावेळी महिलांचे अधिकार, अन्याय विरोधी विविध कलम व त्याचा उपयोग कशा प्रकारे करावा, याबद्दल सांगितले. यावेळी प्रगती सिएमआरसी अध्यक्ष डॉ. हेमलता चिंबुळकर, सचिव सविता मोरे, सदस्य तुपे, गायकवाड व पुजा कालेकर आदी संचालक मंडळ उपस्थित होते.



### सन्मानासोबत आरोग्याची जाणीव

**रसायनी :** समाजाच्या प्रगतीचा कणा असलेल्या महिलांच्या सन्मानासोबत त्यांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा एक स्तुत्य आणि दूरदृष्टीपूर्ण उपक्रम उत्साहात पार पडला. नागरी सामाजिक विकास संस्था आणि खालापूर कलोते माधवबाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त 'महिलांचा सन्मान व आरोग्य जागरूकता कार्यक्रम' मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता वानखेडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर, माधवबाग ओपीडी प्रमुख डॉ. श्रद्धा सातपुते यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाला ज्ञान, अनुभव आणि प्रेरणेची एक समृद्ध किनार लाभली. कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी, आरोग्यविषयक मार्गदर्शन व प्रभावी व्याख्याने आयोजित करण्यात आली. याचबरोबर, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यात आला. हा उपक्रम म्हणजे केवळ कार्यक्रम नव्हे, तर महिलांच्या सशक्तीकरणाचा एक सामाजिक संकल्प ठरला.



### विद्यार्थ्यांनी बनवले 'वेस्ट मधून बेस्ट'

**उरण :** तालुक्यातील आवरे येथाल रामचंद्र म्हात्रे विद्यालयात जागतिक चिमणीदिनानिमित्ताने फ्रेंड्स ऑफ नेचरच्या 'वेस्ट मधून बेस्ट' या संकलपनेतून चिमणींचे घरटे बनविण्याची कार्यशाळा पार पडली. फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) च्या टीमद्वारे विद्यार्थ्यांना कागदी पुठ्ठ्याच्या टाकाऊ रोल पासून चिमण्यांची घरटी बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी १०० घरटी बनवून ती विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली. चिमण्यांची घटती संख्या, त्यामागची कारणे-धोके व चिमण्यांची संख्या कशी वाढविता येईल, याविषयी फॉनच्या टीमने विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, सर्व शिक्षकवृंद व सहकाऱ्यांचे योगदान लाभले. फॉन संस्थेच्या वतीने जयवंत ठाकूर व दिनेश चिरनेरकर हे सहभागी झाले होते.

# खारघर टेकड्यांवर स्वच्छता मोहीम

| खारघर | प्रतिनिधी |

खारघर टेकड्या परिसरात स्वच्छता आणि पर्यावरण जनजागृतीचा उपक्रम राबवत के.जे. सोमय्या स्कूल ऑफ इंजिनीरिंग येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. निसर्ग संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम स्टुडंट्स कौन्सिलच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेसह पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही जाणून घेतली.



या स्वच्छता मोहिमेदरम्यान विद्यार्थ्यांनी खारघर टेकड्यांवरील प्लास्टिक, कागद, बाटल्या आणि इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्यासाठी पुढाकार घेतला. 'टेकड्या वाचवा, निसर्ग जपा' आणि 'प्लास्टिकमुक्त परिसर' या संकल्पनांना बळ देत विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. वाढत्या शहरीकरणामुळे टेकड्यांवर होणारे प्रदूषण आणि प्लास्टिक कचऱ्याचे दुष्परिणाम लक्षात घेता, अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विद्यार्थ्यांनी समूहाने काम करत टेकड्यांवरील विविध भाग स्वच्छ केले. काही विद्यार्थ्यांनी कचरा संकलनाचे काम केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना बळकट झाली. या उपक्रमासाठी खारघर हिल्स वेलफेअर असो., निसर्ग फ्रेंडशिप सोसायटी तसेच सजग नागरिक मंचच्या सदस्यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# नेरळ ग्रामपंचायतीसाठी दोन घंटा गाड्या



| नेरळ | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून आरोग्य विषयक कामांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळे आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार रायगड जिल्हा परिषदेकडून आपला सेस फंड केवळ स्वच्छतेवर खर्च केला जात आहे. त्या निधीमधून नेरळ ग्रामपंचायतीसाठी दोन नवीन घंटागाड्या उपलब्ध झाल्या आहेत. या गाड्यांचे लोकार्पण करण्यात आले असून साधारण १६ लाख ८० हजार रुपये खर्चातून या घंटागाड्या खरेदी करण्यात आल्या आहेत.

■ **सेस फंडातून १६ लाख ८० हजार रुपयांची खरेदी**

नेरळ ग्रामपंचायत सेस फंडातून जिल्ह्यात स्वच्छतेवर खर्च केला जात असून वैयक्तिक स्वच्छता आणि सार्वजनिक स्वच्छता यासाठी हा निधी वापरण्यात येत आहे. जिल्हा परिषदेने त्या निधीमधून नेरळ ग्रामपंचायतसाठी दोन नवीन घंटा गाड्या मंजूर झाल्या होत्या. ८ लाख ३८ हजार रुपयांची १ अशा २ गाड्या जिल्हा परिषद सेस निधीमधून मिळाल्या आहेत. या दोन्ही गाड्या सीएनजी इंधनावर चालणाऱ्या असून त्या नेरळ ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. या गाड्या नेरळ ग्रामपंचायतीच्या ताब्यात आल्यानंतर ग्रामपंचायतीकडून या दोन्ही गाड्यांचे लोकार्पण कर्जत पंचायत समितीच्या सभापती नमिता घारे, उप सभापती चित्रा ठाकरे व जिल्हा परिषद नेरळ गटाच्या सदस्या सुनीता मोरे यांचे हस्ते झाले. यावेळी ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर, ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुरूड तापले

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरूड तालुक्यात सध्या तापमानाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तालुक्याचे तापमान रविवारी (दि.२२) ३५ ते ३६ अंश सेल्सियसवर गेले होते. समुद्रकिनारी देखील गरम हवेच्या वाफा वाहत आहेत. तसेच, येथील डांबरी रस्ते जबरदस्त तापून त्यातून निघणाऱ्या गरम वाफेचा त्रास दुचाकीस्वारांना होत आहे. उन्हाचा तडाखा वाढल्याने शहाळी, कलिंगड, ऊसाचा रस, लिंबू सरबतांना मागणी वाढली आहे. नागरिकांनी दुपारच्या रखरखीत उन्हात जाऊ नये, असे आवाहन संबंधित प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## कर्जतमध्ये भीम गीतांमधून अभिवादन

| वेनगाव | प्रतिनिधी |

महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्ताने कर्जतमध्ये गुरूवारी (दि.१९) रात्री बुद्ध-भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा समस्त कर्जतकरांनी आस्वाद घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, न्याय, स्वतंत्र व बंधुत्व, या महान विचारांचा प्रसार व्हावा आणि समाजामध्ये प्रबोधन व्हावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन तालुक्यातील कवी, गायक व कलाकार यांच्यावतीने येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौकात करण्यात आले होते. या



कार्यक्रमामध्ये भीम व बुद्ध गीते तसेच सामाजिक प्रबोधात्मक गीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याची आणि महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या ऐतिहासिक क्रांती लढ्याची गाथा उपस्थित गायकांनी प्रबोधात्मक सादर केली. या कार्यक्रमाची सुरूवात गायक सुमेध जाधव याने वंदन गीताने केली. नितीन देशमुख या कलाकाराने आपल्या अभिनयाचा अदाकारीने हुबेहुब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची छबी रेखा सादर केली.

## ग्रामीण भागात चुलींचा वापर

| हमरापूर | प्रतिनिधी |

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे भारताला मोठी झळ सोसावी लागत असताना देशात गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. त्यामुळे पेण तालुक्यातील ग्रामीण भागात पुन्हा चुली पेटल्याचे चित्र पहायला मिळत आहे. विशेष म्हणजे व्यावसायिकदृष्टीने देखील स्वयंपाकासाठी पुन्हा चुलींचा वापर होऊ लागला आहे.

गेल्या काही दिवसांपासून अमेरिका, इराण युद्ध सुरुवात आहे. या युद्धामुळे भारतातील पेट्रोल, डिझेल, गॅस, सोने-चांदी, गोडेतेल व इतर वस्तूंचे दर वाढले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची दमछाक झाली आहे. त्यातच गॅस सिलिंडरचा तुटवडा होत असल्याने केंद्र शासनाने तात्काळ व्यावसायिक सिलिंडर देणे बंद केले. तर, घरगुती सिलिंडरना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, २५ दिवसांच्या ऑनलाईन बुक करण्याच्या प्रक्रियेनंतरही गॅस सिलेंडर मिळणे कठीण होत असल्याने ग्रामीण भागातील जनतेने पेण शहरातील भारत गॅस वरदान एजन्सी केंद्रावर मोठ्या प्रमाणावर गर्दी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे सिलेंडरची होणारी कमतरता पाहता ग्रामीण भागातील आणि व्यावसायिकदृष्ट्या नागरिकांनी चुल सुरू करण्यास प्राधान्य दिले आहे.

## गॅस टंचाईमुळे कोळशाला मागणी

| पनवेल | प्रतिनिधी |

युद्धजन्य परिस्थितीच्या पडसादांमुळे घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाला असून, पनवेल परिसरात सकाळपासूनच नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. मात्र, गॅस उपलब्ध न झाल्याने गृहिणींमध्ये संतापाचे वातावरण आहे. त्याचबरोबर व्यावसायिक गॅस सिलिंडरही मिळत नसल्याने अनेक हॉटेल्स, खाद्यपदार्थांच्या गाड्या तसेच चहा विक्रेते यांनी आपले व्यवसाय तात्पुरते बंद ठेवले आहेत. परिणामी खाद्यपदार्थांच्या किंमती वाढू लागल्या आहेत. दरम्यान, गॅसचा पर्याय म्हणून विजेवर चालणाऱ्या



शेगड्यांची मागणी वाढली असून, त्यांच्या किंमतीतही मोठी वाढ झाली आहे. मात्र, वाढत्या खर्चामुळे अनेक लघु व्यावसायिकांनी पुन्हा कोळशाकडे वळण्यास सुरुवात केली आहे. पळस्पे फाटा येथील कोळसा गोदामांमध्ये गर्दी होत असून, कोळशाच्या विक्रीत वाढ झाली आहे. लग्नसराईचे दिवस सुरू असल्याने चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. या सर्व परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असून, येत्या काही दिवसांत कोळशाचे दरही वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शहाबाज संस्थेला संगणक भेट

| अलिबाग | प्रतिनिधी |

कोकण पदवीधर मतदार संघाचे आ. निरंजन डावखरे यांच्या आमदार फंडातून उत्तर व दक्षिण रायगड जिल्ह्यात प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम रविविरी (दि.२२) उत्तेखोल-माणगाव येथील कै.सौ. विजया गोपाळ गांधी अनुदानित आश्रमशाळेत पार पडला. यावेळी शहाबाज येथील सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय संस्थेस संगणक देण्यात आला. यावेळी संस्थेचे प्रविण पाटील, प्रशांत पिंगळे आणि मंगेश भगत हे उपस्थित होते.

## महाराजस्व शिबिराचे आयोजन

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

शासकीय दाखल्यासाठी नागरिकांचा वेळ वाया जाऊ नये यासाठी सरपंच दिपाली पाटील, सदस्य व ग्रामसेवक यांच्या प्रयत्नातून आणि खालापूर तहसील कार्यालयाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर बुधवारी (दि.२५) माजगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार सभागृहात पार पडणार आहे. त्याचबरोबर मोफत आरोग्य तपासणी सुद्धा होणारा आहे. या दोन्ही शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पीएनपीतर्फे मानपत्र देऊन गौरव | हजारो प्रयोगांच्या माध्यमातून भरभरून मनोरंजन**

# 'ऑल द बेस्ट' ऐतिहासिक टप्प्याच्या उंबरठ्यावर

| अलिबाग | प्रतिनिधी |

मराठी रंगभूमीवर गेली तीन दशके प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे 'ऑल द बेस्ट' हे गाजलेले नाटक आता ५००० व्या प्रयोगाच्या ऐतिहासिक टप्प्याच्या उंबरठ्यावर पोहोचले आहे. या पार्श्वभूमीवर पीएनपी सहकारी सांस्कृतिक कलाविकास मंडळ अलिबाग यांच्यावतीने नाटकाच्या संपूर्ण टीमचा मानपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.



सुमारे ३२ वर्षांपूर्वी अभिनेते संजय नार्वेकर, अंकुश चौधरी, भरत जाधव आणि संपदा जोगळेकर यांनी या नाटकाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या दमदार अभिनयामुळे 'ऑल द बेस्ट'ला प्रचंड लोकप्रियता मिळाली आणि मराठी रंगभूमीवर एक वेगळी ओळख निर्माण झाली. त्यानंतरही या नाटकाची परंपरा अखंड सुरू राहिली आहे.सध्याच्या घडीला निखिल चव्हाण, मयुरेश पेम आणि मनमित पेम हे कलाकार आपल्या सहज आणि प्रभावी अभिनयातून प्रेक्षकांचे तितक्याच ताकदीने मनोरंजन करत आहेत. नाटकाचे लेखन व दिग्दर्शन देवेंद्र पेम यांचे असून, त्यांच्या कल्पक मांडणीमुळे आणि अचूक विनोदी टायमिंगमुळे हे नाटक आजही तितक्याच ताजेपणाने रंगमंचावर सादर होत आहे. हजारो प्रयोगांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करत 'ऑल द बेस्ट' हे नाटक सातत्यपूर्ण यशाचे प्रतीक ठरले आहे. प्रत्येक प्रयोगात कलाकारांची ऊर्जा, संवादफेक आणि रंगमंचावरील जिवंतपणा प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतो. त्यामुळेच या नाटकाने दीर्घकाळ लोकप्रियता टिकवून ठेवली आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल पीएनपी सहकारी सांस्कृतिक कलाविकास मंडळ अध्यक्षा चित्रलेखा पाटील यांच्या टीमच्यावतीने अलिबाग नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, मा. नगरसेवक ॲड. गौतम पाटील, अखिल भारतीय नाट्यपरीषदेचे माजी अध्यक्ष तथा आयोजक संदीप गोठिवडेकर, मा. नगरसेविका वृषाली ठोसर तसेच कलाकार देवदत्त नागे, विक्रांत वार्डे, राजन पांचाळ, अमोल नाईक आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नाटकाच्या संपूर्ण टीमचा मानपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

# खरात आत गेला, पण...

नाशिकच्या भोंदूबाबाच्या गोष्टी वाचल्या व पाहिल्यानंतर महाराष्ट्राला पुरोगामी का म्हणावे असाच प्रश्न कोणालाही पडेल. सर्वपक्षीय राजकारण्यांनी भविष्य जाणून घेण्यासाठी त्याच्याकडे लावलेली हजेरी, त्यासाठी केलेले कथित अघोरी विधी, या बाबाने महिलांवर केलेले अत्याचार आणि या सर्वांना सहज बळी पडलेले सामान्य घरातील पुरुष व खास करून म हिला हा सर्वच तपशील शरमेने मान खाली घालायला लावणारा आहे. अशोक खरात नावाच्या एका इसमाने अंकशास्त्र नावाच्या कथित ज्योतिषशास्त्राच्या आधारे केलेली भामटेगिरी आणि पाहता पाहता जमवलेली शेकडो करोडोंची संपत्ती पाहता महाराष्ट्र आणि या देशातील इतर मागास राज्ये यांच्यात काहीच फरक राहिलेला नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. राजकारण हा अनिश्चिततेचा खेळ असतो. त्यामुळे त्यातील अनेक नेत्यांना आपले भविष्य जाणून घेण्याचा छंद असतो. विशेषतः सत्तेतल्या लोकांना ती जाईल याचे कायम भय असते. त्यामुळे ते हमखास असे बाबा व बुवांच्या मागे लागताना दिसतात. असे नेते येऊ लागले की त्या बाबाची वट वाढते, प्रसिध्दी होते व पोलिस व प्रशासनातले लोक त्याला मुजरा करू लागतात. त्यामुळे उभयपक्षी हा सोईचा सौदा असतो. त्यातच अलिकडे असले बाबा सोईस्कररीत्या हिंदुत्ववादी होतात, स्वतःला धर्माचार्य वगैरे म्हणवून घेऊ लागतात. त्यांच्या भक्तांची मते मिळावीत म्हणून मग हिंदुत्ववादी पक्षवाले या बाबांचा उदोउदो सुरु करतात. अशोक खरात हा मर्चंट नेव्हीमध्ये कॅप्टन होता असे सांगतात. तेथून निवृत्त झाल्यावर त्याने अंकशास्त्राचा अभ्यास केला. याच्या नावात शास्त्र असे असले तरी त्यात विज्ञानाचा भाग किती हा संशयच आहे. मात्र तुमच्या नावात पाच अक्षरे आहेत, पाच आकडा तुम्हाला लकी आहे किंवा आज अमुक तारीख आहे, तिची बेरीज इतकी होते, तो आकडा तुम्हाला घातक आहे असे काहीतरी फंडे या अंकशास्त्राने विकसित केलेले आहेत. अनेक लोक यावर विश्वास ठेवतात. अनेक लोकांना नऊ किंवा सात आकडे शुभ वाटतात. त्यासाठी त्यांच्या सर्व गाड्यांचे नंबर तेच असतात.

## चाकणकर गेल्या, बाकीच्यांचे काय

पण हे प्रकार निरुपद्रवी वाटावे असे प्रकार यापुढे सुरू होतात. अशोक खरातसारखी मंडळी तेच करतात. अशाच अंकांच्या भानगडी जुळवून अमुक गोष्ट तुम्हाला वाईट आहे, तिचा दोष काढण्यासाठी तमुक करावे लागेल असे करून यांचा धंदा सुरू होतो. तो कोणत्या नीच व घाणेरड्या थराला जाऊ शकतो हे दिसून आले आहे. एका पीडितेने तक्रार केली म्हणून खरातची चौकशी सुरू झाली. मात्र याबाबत कुजबूज व तक्रारी पूर्वीही होत्या. पण त्याचा राजकीय दबदबा मोठा असल्याने त्या आपोआप दाबल्या गेल्या. यापूर्वी एका स्थानिक वृत्तपत्राने हे प्रकरण छापले तर त्याला माफी मागायला लावली गेली. कहर म्हणजे ती मागण्यासाठी वृत्तपत्रावर दबाव टाकण्यात रुपाली चाकणकर पुढे होत्या. सध्या मिडियाचा सर्व फोकस चाकणकरबाईंवर आहे. या बाईंचे जे फोटो व व्हिडिओ समोर आले आहेत ते पाहता ते तसे गैरही नाही. एकीकडे सावित्रीबाई फुल्यांचे वगैरे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे खरातच्या नादाने वाटेल ते मंत्रतंत्र, पूजा किंवा त्याहूनही अधिक अघोरी प्रकार करायचे हा भयंकर दुटप्पीपणाच होता. अजितदादांच्या कृपेमुळे या चाकणकरबाईंचा राजकीय उत्कर्ष झाला. त्यांचे स्वतःचे असे कर्तृत्व काहीच नाही. पण महत्वाकांक्षा जबरदस्त होती. खरात यालाही असलीच नादान व खर्च करू शकणारी गिऱ्हाईके हवीच होती. या प्रकरणाचा किमान आता तरी भंडाफोड झाल्याने या असंख्य महिलांची आयुष्ये वाचली असतील. हे प्रकरण बाहेर येताच चाकणकर यांनी स्वतः राजीनामा द्यायला हवा होता किंवा सुनेत्रा पवारांनी तरी त्यांना तो द्यायला भाग पाडायला हवे होते. पण ते काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले. अर्थात, यामध्येही काही राजकारण असण्याची शक्यता आहेच. कारण, चाकणकरबाई या जणू खरात प्रकरणातल्या मुख्य सूत्रधार असल्याप्रमाणे सध्या त्यांचे व्हिडिओ बाहेर येत आहेत. पण हाच खरात अमित शाह, फडणवीस, भाजपचे चंद्रकांत पाटील यांना भेटत होता याचीही छायाचित्रे आहेत. एकनाथ शिंदे, दीपक केसरकर हे शिंदेसेनावालेही त्याच्या नियमित भेटीतले किंवा सेवेतले असावेत असे छायाचित्रांवरून वाटते. या सर्व राजकारणी मंडळींनीही चाकणकर यांच्याप्रमाणेच प्रायश्चित्त घ्यायला हवे. या लोकांचे खरातसोबत किती व काय प्रकारचे संबंध होते हे उघड व्हायला हवे.

## जनतेनेही विचार करावा

शिंदे मुख्यमंत्री असताना वर्षावर काळ्या जादूचे प्रयोग होत असल्याची टीका संजय राऊत करीत असत. शिंदे हे गुवाहाटीला का गेले, तिथे त्यांनी काही नवस बोलला होता का याचीही चर्चा होती. याचा छडा या निमित्ताने लावला जायला हवा. दुर्दैवाने तसे होण्याची शक्यता कमी आहे. खरातविरुध्द गुन्हे दाखल करून बराच काळ त्याचे खटले चालवले जातील आणि राजकीय मंडळींविरुध्द काही किटाळ येऊ नये याची रीतसर काळजी घेतली जाईल असाच संभव अधिक आहे. खरात याचा सहायक निलेश जाधव याने खरातविरुध्द पुरावे म्हणून अनेक छायाचित्रे, व्हिडिओ दिल्याचे बोलले जाते. जाधव हाही एक आरोपी आहे. पण तो सुरक्षित राहील का याविषयी अनेकांनी शंका व्यक्त केली आहे. असे वेडेवाकडे काही न होता या प्रकरणाची पाळेमुळे खणली गेली व खरातने सर्व पक्षाच्या राजकारण्यांना कशी भुरळ घातली हे उघड झाले तरच महाराष्ट्राच्या घसरत चाललेल्या राजकारणाला जरा चाप बसेल. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच्या काळात खरातच्या मंदिर ट्रस्टला स्थानिक धरणातून पाणी उचलण्याचा परवाना दिला गेला अशा बातम्या आहेत. हे करवून आणण्यामागे कोण होते व आता ते कोणत्या पक्षात आहेत हे तपासायला हवे. अनेक आयएएस व आयपीएस अधिकारीही यात अडकल्याचे म्हटले जाते. त्यामुळे हे प्रकरण याहून अधिक फुटू नये यामध्ये अनेकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. खरातला अटक वगैरे करून फडणवीस कसे निस्पृह आहेत हे भासवले गेले आहे. पण या प्रकरणाची पुरती तड लावून राजकारणी व अधिकारी यांनाही काही शिक्षा झाल्या तरच त्यांचा निस्पृहपणा सिध्द होईल. असे करताना खुद्द आपल्या भाजप पक्षाच्या लोकांना न वगळण्याची हिंमत त्यांना दाखवावी लागेल. दरम्यान, सामान्य लोकांमधल्या मूर्ख अंधश्रध्दांमुळेच खरातसारखे भामटे इथपर्यंत मजल मारत असतात. अमुक गोष्ट केली नाहीस तर तुझा नवरा मरेल असे एखादा बाबा सांगतो व ती महिला त्यावर २०२६ सालातल्या महाराष्ट्रात विश्वास ठेवते हे समजण्याच्या पलिकडचे आहे. महिलांवरील अत्याचारामुळे हा प्रकार इतक्या वेगाने बाहेर आला. पण आजही महाराष्ट्रात अनेक बुवा, महाराज, बापू, बाबा लोकांच्या भावनिकतेचा, श्रध्देचा व दुबळेपणाचा फायदा घेऊन त्यांना फालतू कर्मकांडांमध्ये अडकवतात व त्यांच्याकडून हजारो रुपये लुटत राहतात. खरातच्या निमित्ताने या प्रकारांविरुध्दही आवाज उठवण्याची गरज आहे.

विचार

# साठवणुकीत दिलासा, उद्योगांना फटका

***तेलटंचाईच्या काळात दिलास्याची बाब म्हणजे देशातील अनेक ठिकाणी तेल आणि वायूची भूमिगत साठवण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दुसरीकडे, क्रुड ऑईलच्या शुद्धीकरणात मिळणाऱ्या कच्च्या मालावर अवलंबून असणारे उद्योग अडचणीत आल्याचे चित्र आहे. दरम्यान, स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा जाणवू लागल्यामुळे इंडक्शन कुकटॉप्सचा व्यवसाय चांगलाच वधारला आहे.***



**महेश देशपांडे**

अमेरिका आणि इस्राईलने इराणवर हल्ला केल्यानंतर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या वाहतुकीवर निर्बंध घातले. त्यामुळे जगातील अनेक देशांच्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. भारतात आयात होणाऱ्या तेलाच्या सुमारे ९० टक्के तेलाची वाहतूक होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. साहजिकच याचा थेट परिणाम देशातील सामन्य जनतेवर होत आहे. त्यातल्या त्यात दिलाशाची बाब म्हणजे देशातील अनेक ठिकाणी तेल आणि वायूची भूमिगत साठवण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दुसरीकडे÷पीव्हीसी पाईप निर्मितीसारख्या अनेक व्यवसायांसाठी लागणारा कच्चा माल क्रुड ऑईलच्या शुद्धीकरणात मिळतो. असे उद्योग अडचणीत आल्याचे चित्र आहे. दरम्यान, स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा जाणवू लागल्यावर अनेक लोक इंडक्शन कुकटॉप्सकडे वळू लागले आहेत. गॅसपेक्षा हे कुकटॉप्स अधिक किफायतशीर असल्याचेही अढळून येत आहे.

इराण आणि इस्राईल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे भारताच्या ऊर्जासुरक्षेची खरी स्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. भारत आपल्या गरजेपैकी सुम ारे ९० टक्के कच्चे तेल, ६० टक्के एलपीजी आणि ५० टक्के एलएनजी इतर देशांकडून आयात करतो. आयातीवरील हे प्रचंड अवलंबित्व पुरवठा साखळीत अचानक अडथळा निर्माण झाल्यास भारतावर गंभीर संकट ओढवू शकते. सध्या होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणने लावलेल्या निर्बंधांमुळे निर्माण झालेली परिस्थिती त्याचेच उदाहरण आहे; मात्र काळानुरूप भारताने ऊर्जा क्षेत्रात आपली क्षमता बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे, हे ही लक्षात घ्यायला हवे. भूमिगत साठवणुकीची उभारणी असो किंवा तेल आयातीचे स्रोत शोधण्याचा प्रयत्न; भारत हळूहळू ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने अधिक सक्षम होत आहे. सध्याच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर, धोरणात्मक तेलसाठ्यांसह पेट्रोल आणि डिझेलचा साठा सुमारे २५ दिवसांपर्यंत वापरता येऊ शकतो. देशात उपलब्ध असलेला स्वयंपाकाचा गॅस, म्हणजेच एलपीजी, साधारणपणे २५ ते ३० दिवसांपर्यंत पुरू शकतो. औद्योगिक वापरासाठी असलेला एलएनजी सुमारे दहा दिवसांपर्यंत उपलब्ध राहू शकतो. ऊर्जा क्षेत्रातील ही तुलनेने मजबूत तयारीच सध्या घबराटीची स्थिती निर्माण होऊ देत नाही. उलट, पाकिस्तानसारख्या काही देशांमध्ये जवळपास लॉकडाऊनसदृश परिस्थिती दिसून येत आहे. भारतात अनेक भूमिगत गॅस साठवण सुविधा उभारण्यात आल्या आहेत. यांपैकी सर्वात जुनी गुहा विशाखापट्टणम येथे आहे. सुमारे दहा वर्षांपूर्वी 'इंडियन स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हज लिमिटेड'ने ही सुविधा उभारली. या गुहांमध्ये एकूण ५.३३ दशलक्ष टन कच्च्या तेलाचा साठा ठेवता येतो. तो जवळपास ४० दशलक्ष पिंप इतका आहे. हा साठा देशाच्या साधारण दहा दिवसांच्या गरजांसाठी पुरेसा मानला जातो. बाह्य हल्ले, ड्रोन आक्रमणे किंवा नैसर्गिक आपत्तींपासून तुलनेने या सुविधा सुरक्षित असतात. शिवाय त्यांचा संचालन खर्चही कमी असतो. जमिनीखाली असल्यामुळे आग लागणे किंवा तेलगळती होण्याचा धोका तुलनेने कमी असतो.

आतापर्यंत सरकारने या साठ्यांचा थेट वापर केलेला नाही; मात्र गरज भासल्यास हे साठे एक धोरणात्मक संरक्षक कवच म्हणून काम करतात आणि सरकारला पर्यायी आयात व्यवस्थेसाठी वेळ मिळतो. या भूमिगत साठवण सुविधेचे पूर्ण नाव 'साउथ एशिया एलपीजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड' असे आहे. विशाखापट्टणम येथील डॉल्फिन हिल्स परिसरात ही सुविधा उभारण्यात आली आहे. ही 'एचपीसीएल' आणि फ्रान्समधील ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी 'टोटल एनर्जी' यांच्यातील सम ान भागीदारीमध्ये उभारलेला संयुक्त प्रकल्प आहे. २००७ पासून या सुविधेचा वापर सुरू आहे. येथे सुमारे ६० हजार टन एलपीजी साठवण्याची क्षमता आहे. या गुहेत 'एचपीसीएल' आणि 'टोटल एनर्जी' यांचा मोठ्या प्रम ाणावर एलपीजी साठा ठेवला जातो. याशिवाय 'इंडियन ऑईल' आणि 'भारत पेट्रोलियम' यांसारख्या कंपन्याही गरज पडल्यास या साठवण क्षमतेचा वापर करतात. मंगळुरूमध्ये उभारण्यात आलेली आणखी एक भूमिगत साठवण सुविधा 'एचपीसीएल'साठी तयार करण्यात आली आहे. या सुविधेची साठवण क्षमता सुमारे ८० हजार टन आहे. त्यामुळे सुमारे महिनाभर कोट्यवधी घरांच्या एलपीजी गरजा पूर्ण करता येऊ शकतात. ही सुविधा 'मेघा इंजिनीअरींग'या कंपनीने उभारली आहे आणि सप्टेंबर २०२५ पासून ती पूर्ण क्षमतेने कार्यरत झाली आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने या साठवण सुविधांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशासाठी अशा धोरणात्मक साठ्यांमुळे संकटाच्या काळात वेळ मिळतो आणि पर्यायी मार्ग शोधण्याची संधीही उपलब्ध होते.

दुसरीकडे आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम आता थेट उद्योगावर झाला आहे. बीडमध्ये ठिबक सिंचनचे पाईप बनवणाऱ्या कंपनीचे उत्पादन मागील पाच दिवसापासून बंद पडले आहे. कच्चे तेल शुद्धीकरण प्रकल्प बंद पडल्याने ठिबक सिंचन पाईप बनवण्यासाठी कच्चा माल मिळत नसल्याने व्यवसायांना फटका बसत आहे. पुरवठ्याची साखळीदेखील विस्कळीत झाली आहे. ठिबक सिंचन पाईप बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल कच्चे तेल शुद्धीकरण करणाऱ्या प्रकल्पामधून मिळतो; परंतु आता रिफायनरीमध्येच क्रूड ऑइल येत नसल्याने तेथील उत्पादन बंद आहे. त्याचा परिणाम या उद्योगावर झाला आहे. यापूर्वी कधीही न उद्भवलेली ही परिस्थिती असून कच्चामाल जवळपास दुप्पट किमतीत खरेदी करण्याची वेळ उद्योजकांवर आली आहे; परंतु त्यानंतर ठिबक सिंचनचे पाईपदेखील महागणार असल्याने ते शेतकऱ्यांना परवडणारे नसेल. अशा स्थितीत आता युद्ध थांबल्यास हे उत्पादन पूर्वपदावर येईल. युध्दाचा थेट परिणाम मुंबईतील ऐतिहासिक क्रॉफर्ड मार्केट आणि नाशिकमधील द्राक्षनिर्यातीवर बसला आहे. मुंबईचे मुख्य व्यापारी केंद्र असलेल्या क्रॉफर्ड मार्केटमध्ये आयात होणाऱ्या सुकामेव्याची आवक कमालीची घटली आहे. इराणी पिस्ता, खजूर, बेदाणे आणि पाईन नट्स यांसारख्या पदार्थांचा पुरवठा खालावला आहे. नाशिक जिल्ह्यालाही या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. गेल्या वर्षी नाशिकमधून एक लाख ३१ हजार टन द्राक्षांची निर्यात झाली होती; यंदा हे प्रमाण ६५ ते ७० हजार टनांवर आले आहे. युरोप आणि आखाती देशांकडे जाणारी द्राक्षे बंदरांवर अडकून पडली असून कांदा, डाळिंब, पालेभाज्यांची निर्यातही मंदावली आहे.

दरम्यान, मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या भू-राजकीय तणावाचा परिणाम आता सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरावर होत आहे. जागतिक तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठा साखळी गंभीरपणे विस्कळीत झाली आहे. त्यामुळे भारतात 'एलपीजी'बाबत चिंता निर्माण झाली आहे. तथापि, सरकारने स्पष्ट केले आहे, की देशांतर्गत उत्पादन वाढले आहे. घाबरून जाण्याची गरज नाही. सुरळीत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, सरकारने आवश्यक वस्तू कायदा (इस्मा) देखील लागू केला आहे. असे असूनही, रिफिल बुकिंगमध्ये विलंब आणि गॅसच्या वाढत्या किमतींच्या वृत्तांमुळे ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या भीतीमुळे लोक पर्यायी स्वयंपाक पद्धतींकडेही वळत आहेत. महानगरांमध्ये इलेक्ट्रिक कुकटॉप्स, म्हणजेच इंडक्शन कुकटॉप्सच्या विक्रीत अचानक वाढ झाली आहे. दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, चेन्नई आणि कोलकातासारख्या प्रमुख शहरांमधील अनेक भागात इंडक्शन कुकरचा साठा संपला आहे. या गोंधळात प्रत्येक ग्राहकाला एक प्रश्न पडतो तो असा, की पारंपारिक गॅस स्टोव्हपासून इलेक्ट्रिक इंडक्शन कुकरकडे वळणे आर्थिकदृष्ट्या शहाणपणाचे आहे का? त्याचे उत्तर असे, की गॅस स्टोव्हवर स्वयंपाक करताना, निर्माण होणाऱ्या उष्णतेपैकी सुमारे ६० टक्के उष्णता भांड्याच्या बाजूने हवेत वाया जाते. याचा अर्थ असा, की तुम्ही ज्या गॅससाठी पैसे देता, त्यापैकी फक्त ४० टक्के तुमचे अन्न शिजवण्यासाठी वापरला जातो. इंडक्शन तंत्रज्ञान बरेच आधुनिक आणि वैज्ञानिक आहे. ते काचेच्या पृष्ठभागाखाली ठेवलेल्या तांब्याच्या कॉइल आणि चुंबकीय क्षेत्रांच्या तत्त्वावर कार्य करते. या अचूक तंत्रज्ञानामुळे, प्रेरण कार्यक्षमता ९० टक्क्यांपर्यंत असते आणि उर्जेचा अपव्यय कमी असतो. इंडक्शनद्वारे समान प्रमाणात उष्णता ऊर्जा निर्माण करायची असेल, तर त्यासाठी अंदाजे ७८ युनिट वीज लागेल. प्रति युनिट आठ रुपयांचा वीज दर गृहीत धरल्यास एकूण मासिक खर्च फक्त ६२४ असेल. याचा अर्थ गॅस सिलिंडरच्या तुलनेत तुम्ही दरमहा सुमारे ३०० रुपये थेट वाचवू शकता. इंडक्शन कुकटॉपचा एक अतिरिक्त फायदा म्हणजे तापमान स्थिर राहते आणि साफसफाई करणे सोपे होते. १४.२ किलो सिलिंडरची किंमत सुमारे बाराशे ते दीड हजार रुपये असते.

# "जागतिक हवामान दिन"

**अरविंद मोरे**

आठवतो का तो दिवस २६ जुलै २००५ चा. तो पाऊस, ती दाणादाण. हे काय होत ? थांबता थांबत नव्हता पाऊस. हवामानाची काळजी न घेतल्याचे परिणाम होते ना. २१ वर्षे ह्या घटनेला होऊन गेले परंतु अजूनही ही घटना आठवली की, अंगावर अगदी शहरे येतात आणि माणूस तिथे थांबून जातो.

जागतिक हवामान दिन दरवर्षी २३ मार्च रोजी साजरा केला जातो. जागतिक हवामान संघटनेची २३ मार्च १९५० रोजी झालेली स्थापना आणि हवामानशास्त्रातील योगदानाच्या स्मरणार्थ १९६१ पासून हा दिवस पाळला जातो. हवामान बदल, सुरक्षितता आणि मानवी कल्याणासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा याचा मुख्य उद्देश्य.

जसे की, आपणास माहीतच आहे की, विश्वात बरेच दिवस साजरे केले जातात. त्यापैकी २३ मार्च हा सुद्धा दिवस जगात जागतिक हवामान दिन म्हणून साजरा केला जातो. तो दिवस साजऱ्या करण्यामध्ये उद्देश्य हाच असतो की, लोकांमध्ये जनजागृती करणे, जे काही वाईट होत असेल त्यावर उपाय करणे, भविष्याचा वेध घेणे. त्याची अंमलबजावणीसाठी व्यवस्थित आयोजन करणे. लोकांमध्ये जनजागृती करून लोकांना त्यामध्ये समाविष्ट करून घेणे आणि ती उपाय योजना यशस्वी करणे असा असतो.

साधारणतः ७० वर्षा पूर्वीचा जर आपण आपल्या भारतातील हवामानाचा इतिहास बघितला तर आपल्याला काय आढळून येईल की, ७ जून म्हणजे सात जुनलाच मान्सून सुरु व्हायचा. हे कालचक्र नियमित रूपाने चालू असायचे. बरोबर ४ महिन्यांचा पाऊस पडायचा. पावसाळ्यात भरपूर पाऊस पडायचा. नदी नाल्यात पूर यायचा. धरणे, तलाव तुडुंब भरायची आणि वर्षभर पाण्याची चिंता दूर व्हायची. त्यानंतर ऑक्टोबर ते फेब्रुवारी महिन्यापर्यंत थंडी पडायची. थंडी पण भरपूर पडायची. थंडी पडल्यामुळे गव्हासारख्या पिकांना पोषक असे हवामान मिळायचे. गहू आणि हरभऱ्याचे पीक थंड वातावरणामुळे चांगले यायचे. आता थंडी गायब झाल्यामुळे त्याचा परिणाम पिकांवर होत आहे.

त्यानंतर मार्च ते जून उन्हाळा असायचा. उन्हाळ्यात भरपूर उष्ण हवामान असायचे. आपली जमीन भरपूर तपायची, त्यामुळे यौग्य ती प्रक्रिया घेऊन अगदी वेळेत ७ जूनला मान्सून सुरु होऊन पावसाळा वेळात सुरु व्हायचा. आता हे कालचक्र, ही सायकल हवामानाच्या बदलामुळे पूर्णतः बदललेली आहे. आता वेळी-अवेळी पाऊस पडतो. त्यामुळे पिकांचे भरपूर नुकसान होते व शेतकरी खूपच हवालदिल झाला आहे. अर्थातच अन्नधान्य, फळे, फुलांच्या उत्पादनावर परिणाम होतो आहे. अन्नधान्य व फळे यांचे उत्पादन कमी झाल्यामुळे त्यांच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आह. त्याचा परिणाम म्हणून महागाई मोठ्या प्रमाणात वाढते व सामान्य जनता ही खरेदी करू शकत नसल्यामुळे त्यांच्या स्वास्थावर परिणाम होऊन ते आजारी पडतात व नंतर ते मृत्युमुखी पडतात. असे चित्र हवामानात बदल झाल्यामुळे आपल्याला बघायला मिळत आहे. जागतिक हवामान दिवस हा साजरा केला जातो तो पृथ्वीचे हवामान, हवामानशास्त्र आणि पाण्याशी संबंधित बदलांविषयी लोकांमध्ये जागरूकता वाढविण्यासाठी. हा दिवस साजरा करण्यामागे हा उद्देश असतो की, हवामान बदलाचे परिणाम नैसर्गिक आपत्ती जसे की, वादळ, पूर आणि दुष्काळ आणि त्यापासून संरक्षणाचे उपाय यावर प्रकाश टाकण्यासाठी. हवामान बदल झाल्यामुळे जागतिक तापमानातवाढ, अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी आणि समुद्रसपाटी मध्ये वाढ यासारख्या गंभीर समस्यांना कारणीभूत ठरत आहे. यामुळे कृषी उत्पादनामध्ये घट होते, आरोग्य समस्यांमध्ये वाढ होते. जैवविविधतेचा ऱ्हास आणि नैसर्गिक आपत्ती मध्ये वाढ होऊन मानवी जीवनावर व पर्यावरणावर विनाशकारी परिणाम होत आहेत.

पावसाचे अनिश्तिच प्रमाण आणि वाढते तापमान यामुळे पिकांचे मोठा नुकसान होते. ज्यामुळे अन्नटंचाईची समस्या निर्माण होते. कडाक्याची उष्णता, उष्णतेच्या लाटा आणि श्वसनाचे आजार, हृदयविकार व संसर्गजन्य रोगांमध्ये वाढ होते. वादळे, पूर ढगफुटी आणि दुष्काळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीचा वारंवारता आणि तीव्रता वाढते. हिमनद्या वितळतात व त्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. ज्यामुळे किनारपट्टीवरील शहरे बुडण्याचा धोका निर्माण झाला आहे. हवामान बदलावर उपाययोजना करणे फार गरजेचे आहे. ह्यात वृक्षारोपण आणि जंगल संवर्धन करणे फार गरजेचे आहे कारण झाडे कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात. ह्यात जास्तीत जास्त झाडे लावणे आणि अस्तित्वात असलेली जंगले वाचवणे हा सर्वात महत्वाचा उपाय आहे.

नवीकरणीय ऊर्जेचा वापर करणे गरजेचे आहे. कोळसा आणि तेल ऐवजी सौर ऊर्जा, पावन ऊर्जा आणि जलविद्युत यांसारख्या अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढविणे गरजेचे आहे.

आपल्याला हवामानात चांगले परिणाम आणायचे असेल तर ऊर्जेची बचत करणे गरजेची आहे. ह्यात वीज वाचवणे, एल.ई. डी. ब्लब वापरणे आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरात नसताना बंद करणे फार जरुरीचे आहे. सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा लागेल. ह्यात खाजगी वाहनऐवजी बस, मेट्रो, रेल्वे, लोकल किंवा सायकलीचा वापर करणे, ज्यामुळे इंधन जाळणे कमी होते. प्लास्टीचा वापर करणे टाळावे लागेल. पुनर्वापर करण्यायोग्य पिशव्यांचा वापर करणे आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करणे, सेंद्रिय शेती करणे, पाण्याचा योग्य वापर करणे आणि रासायनिक खतांचा वापर कमी करणे. जनजागृती, जागरूकता करणे फार गरजेचे आहे. वस्तूंचा पुनर्वापर करणे, कचरा कमी करणे आणि हवामान बदलाविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे फार गरजेचे आहे.

एकंदरीत पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढतच आहे. पुढच्या पिढीसाठी आपण काळजी घेणे फार गरजेचे आहे. हवामानामुळे ऍलर्जी सारखे विकार वाढत आहेत. मानवाच्या आरोग्यासाठी हवामानाची काळजी घेणे नितांत गरजेचे आहे. सामूहिक प्रयत्नामुळे आपण नक्कीच हवामान चांगले राखण्यासाठी कटिबद्ध असू असे हवामान दिनानिमित्त घेतलेली उजळणी.

लोकसंसद

## जगातील संवेदनशील चिंचोळा जलमार्ग, होर्मुझची सामुद्रधुनी!

इराण आणि अमेरिका-इस्राएल युद्ध टोकाला पोहोचल्यानंतर भारतासह जगभरातील अनेक देशांना अभूतपूर्व इंधन टंचाईचे चटके बसू लागले. याचे मुख्य कारण म्हणजे जगातील एकूण सागरी तेलाच्या वाहतुकीपैकी सुमारे एक पंचमांश म्हणजे २० टक्के ज्या 'होर्मुझची सामुद्रधुनी' नावाच्या अरुंद सागरी जलमार्गातून होते त्या सामुद्रधुनीतून इराणने चीनसारखे काही अपवाद वगळता आंतरराष्ट्रीय जल वाहतुकीस केलेली बंदी. त्यामुळे सांप्रतच्या युद्धाच्या काळात 'होर्मुझची सामुद्रधुनी' हा शब्द सर्वोतोमुखी होऊन सर्वाधिक चर्चिला गेला. खरे तर सामुद्रधुनी (इंग्रजी 'स्ट्रेट') म्हणजे दोन महासागरांना जोडणारा अरुंद जलमार्ग. पृथ्वीतलावर अशा दोन महासागरांना जोडणाऱ्या अनेक सामुद्रधुनी आहेत. परंतु या सर्व सामुद्रधुनीमध्ये जागतिक तेल अर्थकारणासाठी प्रसिद्ध असलेली 'होर्मुझची सामुद्रधुनी' अत्यंत महत्वाची मानली जाते. ९० सागरी मैल (१६७ किमी) लांबी असलेली आणि किमान २१ सागरी मैल (३९ किमी) रुंदी असलेली होर्मुझची सामुद्रधुनी हा इराणचे पर्शियन आखात आणि ओमानचे आखात यांच्या दरम्यान असलेला एक चिंचोळा जलमार्ग आहे. याच्या उत्तरेस इराण तर दक्षिणेस संयुक्त अरब अमिराती व ओमान हे देश आहेत. सद्य परिस्थितीत युद्धामुळे संवेदनशील बनलेली 'होर्मुझची सामुद्रधुनी' ही युद्ध थांबून जागतिक इंधन पुरवठा सुरळीत होईपर्यंत जागतिक चर्चेत राहणार आहे.



**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# जरा याद करो कुर्बानी...

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
२३ मार्च
१)श्रीमं.मंगला नानासाहेब थोरात
२३-०३-१९६२
चेंढरे, अलिबाग

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै.अरुणा देविदास म्हात्रे, स्मृतिप्रीत्यर्थ, नवेगाव पेण**

## रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम

**पनवेल :** सुरक्षित आणि जबाबदार प्रवासाची जाणीव वाढवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया यांनी महाराष्ट्रातील चिपळूण येथे संरचित रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम आयोजित केली. या उपक्रमात मेरी माथा स्कूल आणि सती इंग्लिश मीडियम स्कूलमधील २४०० हून अधिक सहभागी एकत्र आले आणि दैनंदिन वाहतूक जागरूकतेला एक रंजक व सहभागी शिक्षणाचा अनुभव मिळाला. या मोहिमेत रस्ता सुरक्षा विषयावरील जनजागृती सत्रे, खेळ, क्विझ आणि परिस्थिती आधारित चर्चा यांचा समावेश होता. या उपक्रमात काम करत शिकणे या पद्धतीवर भर देण्यात आला.

# उनपच्या विकासाआड भाजप

## बहुमताच्या जोरावर १० पैकी ७ ठराव नामंजूर; भाजप सदस्य व मुख्याधिकाऱ्यांवर घणाघाती टीका

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेच्या बजेट नंतर पहिल्याच सर्वसाधारण सभेत बहुमताच्या जोरावर भाजपने शहरवासियांच्या दृष्टिकोनातून अत्यंत आवश्यक असलेले विकासकामांचे १० पैकी ७ ठरावांना विरोध करून नामंजूर केले आहेत. यामुळे भाजपला उरण शहराच्या विकासाबाबत काहीएक सोयर-सुतक उरले नसल्याचा आरोप नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी पत्रकारांशी बोलताना केला आहे. तसेच मुख्याधिकारी समीर जाधव हे शहरातील समस्या, विकासकामांबाबत सुरुवातीपासूनच कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नसून, महिला नगराध्यक्ष म्हणून मानसिक खच्चीकरण करीत असल्याचाही गंभीर आरोप नगराध्यक्षांनी पत्रकारांशी संवाद साधताना केला आहे.

उरण नगरपरिषदेच्या आणि

### ● महिला म्हणून मानसिक खच्चीकरण; नगराध्यक्षांचा आरोप

त्यानंतर पार पडलेल्या उरणमधील जि.प., पंचायत समितीच्या निवडणुकीतही भाजप आमदार महेश बालदी यांना महाविकास आघाडीने चारही मुंड्या चित केले. उरण तालुक्यात दोन्ही निवडणुकीत महाविकास आघाडीचेच वर्चस्व राहिल्याने भाजपला लागोपाठ हादरे बसले आहेत. यातून भाजप अद्यापही सावरलेली दिसत नाही. याचा प्रत्यय उनपच्या लागोपाठ झालेल्या दोन्ही सर्वसाधारण बैठकीतून महाविकास आघाडी व शहरवासियांना आला आहे.

उनपच्या निवडणुकीत नगराध्यक्षासह महाविकास आघाडीने २१ पैकी ९ जागा जिंकल्या आहेत. तर, भाजपने १२ जागांवर विजय मिळविला आहे. त्यामुळे नगराध्यक्षपद महाविकास आघाडीकडे, तर बहुमत भाजपकडे अशी राजकीय स्थिती उनपमध्ये निर्माण झाली आहे. याचा राजकीय लाभ उठवत भाजपच्या १२ नगरसेवकांनी उनपच्या वार्षिक बजेटच्या सर्वसाधारण सभेलाच गैरहजर राहून महाविकास आघाडीला दणका दिला होता. तर, बुधवारी (१८) आयोजित करण्यात आलेल्याउनपच्यासर्वसाधारणसभेत विषयपत्रिकेवरील शहरवासियांच्या दृष्टिकोनातून अत्यंत आवश्यक असलेले विकासकामांचे १० पैकी ७ ठरावांना भाजपच्या १२ सदस्यांनी विरोध दर्शवून नामंजूर केले आहेत. यामुळे उनपच्या पुढील कामकाजाची जणू चुणूक बहुमताच्या जोरावर भाजपने महाविकास आघाडीला दाखवून दिली आहे. भाजपचे उपनगराध्यक्ष रवि भोईर यांनी नामंजूर करण्यात आलेल्या ठरावांचे समर्थन केले आहे. यापुढेही सभागृहात भाजपची अशी भूमिका कायम राहणार असल्याचेही त्यांनी माहिती देताना स्पष्ट केले. शहरवासियांच्या विकासकामांचे मांडलेले ठराव सभागृहातील भाजप सदस्यांच्या विरोधामुळे नामंजूर झाल्याने मात्र महाविकास आघाडीमध्ये संतापाचे वातावरण आहे.सर्वसाधारण सभेनंतर नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी लागलीच पत्रकारांशी संवाद साधला.उरणवासियांच्या विकासकामांना विरोध करणाऱ्या भाजपच्या १२ सदस्य व नेतृत्वावरही नगराध्यक्षांनी घणाघाती टीका केली. मात्र, लोकहिताचे व शहरवासीयांच्या विकासकामांचे ठराव जिल्हाधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी भाजपच्या दबावाखाली असलेले मुख्याधिकारी समीर जाधव हे शहराच्या विकासकामांबाबत सुरुवातीपासूनच कोणत्याही प्रकारचे सहकार्य करीत नाहीत. उनपच्या सर्वच विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही मुख्याधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय एकही फाईल नगराध्यक्षांना देऊ नयेत अथवा चर्चा, बैठक घेऊ नयेत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

केवळ महिला नगराध्यक्ष आहोत म्हणून मुख्याधिकारी आपले मानसिक खच्चीकरण करीत असल्याचाही गंभीर आरोपही नगराध्यक्षांनी पत्रकारांशी संवाद साधताना केला आहे. मात्र, नगराध्यक्षांनी केलेल्या गंभीर आरोपांबाबत विचारणा करण्यासाठी वारंवार मोबाईलवरून संपर्क साधला. मात्र, मुख्याधिकाऱ्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. यामुळे त्यांची या आरोपांबाबतची प्रतिक्रिया समजू शकलेली नाही.

## अध्यक्षपदी योगेश खडतर



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

उमरोली गावचे युवा उद्योजक योगेश काशीराम खडतर यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माणगाव तालुकाध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, तालुकाध्यक्ष परेश सांगले यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

योगेश खडतर हे कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसतानाही संघटनेत सक्रिय कार्य करत असून तरुणांमध्ये त्यांची चांगली ओळख आहे. त्यांच्या निवडीमुळे युवामोर्चा अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. निवडीनंतर खडतर यांनी तरुणांच्या रोजगार, शिक्षण व क्रीडा विषयक प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून तालुक्यात संघटन मजबूत करण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

## वसंत चिर्लेकर जीवन गौरव पुरस्कारांनी सन्मानित



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

समृद्ध रंगभूमीची परंपरा लाभलेल्या चिरनेर रंगभूमीचे ज्येष्ठ रंगकर्मी तथा ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शक वसंत दामोदर चिर्लेकर यांना नाट्य क्षेत्रातील त्यांच्या भरीव कामगिरीबद्दल कोकण मराठी साहित्य परिषद व मधुबन कट्ट्याच्या वतीने, पाले उरण येथे मंगळवारी (दि.१७) पार पडलेल्या महाकाव्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर यांनी गाजविलेल्या ग्रामीण रंगभूमीच्या नाट्यकलेचा जीवनपट सादर करण्यात आला. त्यांनी साकारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज या व्यक्तिरेखांसह सामाजिक नाटकातील खलभूमिकांचे उपस्थित साहित्यिक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून कौतुक केले. आजही वयाच्या ७६ व्या वर्षीदेखील त्यांनी नाट्यदिग्दर्शनाच्या कामाचे सातत्य कायम टिकवून ठेवले असल्याचे मान्यवरांनी भाषणातून सांगितले.

याप्रसंगी साहित्यरत्न एल.बी. पाटील, साहित्यिक प्रदीप ढवळ, निवेदिका जयू भाटकर, संजय गुंजाळ, कोमसाप अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, निवेदिका रंजना केणी, समता ठाकूर, संजीव पाटील, उज्वला दिघे, ज्योती राजपूत, संध्या दिवकर, अक्षता गोसावी, संजना जवाटकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## खोपोली शहर विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय

### ● नगराध्यक्ष कुलदीप शेंडे यांची माहिती

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषदेची विशेष सभा १७ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडली. या सभेत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून, त्याची माहिती नगराध्यक्ष कुलदीप शेंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे उपस्थित होते.

नगराध्यक्ष शेंडे यांनी सांगितले की, दिव्यांग नागरिकांच्या पेन्शनमध्ये गेल्या पाच वर्षांत वाढ झाली नव्हती. त्यामुळे त्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन दरमहा ५०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मालमत्ता कर थकबाकीदारांना शास्तीमध्ये ५० टक्के सूट देण्यास मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय १६१ अर्जदारांना ५० टक्क्यांपेक्षा अधिक शास्ती माफी देण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

प्रभाग क्रमांक १० मधील उमरजी पटेल नगर येथे श्रीराम मंदिराजवळ सामाजिक सभागृह उभारण्यास मंजुरी देण्यात आली. गगनगिरी महाराज आश्रमाकडे जाणारा अरुंद रस्ता १८ मीटर रुंदीचा करण्याचा निर्णयही घेण्यात आला असून, त्यामुळे वाहतूककोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

जुना मुंबई-पुणे महामार्गावरील दुभाजकावर वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सीएसआर निधीतून शहरातील शाळांमध्ये सौरऊर्जा प्रणाली बसविण्यात येणार आहे.

## हॉटेलमध्ये शिरून तलवारीने वार करणाऱ्याला अटक



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे उपनगरातील हॉटेल चालकाकडून महिन्याला पाच हजार रूपयांचा हप्ता देण्यावरून झालेल्या वादानंतर हॉटेलच्या व्यवस्थापकावर तलवारीने केलेल्या हल्ल्यातील संशयित आरोपीला कामोठे पोलिसांनी कळंबोली येथून अटक केली आहे. आशिष घोडके उर्फ आशाभाय असे त्याचे नाव आहे. अजून तीन दिवस अशोकला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. अशोकवर यापूर्वीसुद्धा मारहाणीचे भांडुप व कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हे नोंद आहेत.

३० वर्षांचा अशोक हा मूळचा सांगली येथील राहणारा असून, त्याला यापूर्वी भांडूपच्या एका गुन्ह्यात अटक झाल्यानंतर तो मुंबईच्या कारागृहात अनेक महिने राहिला. त्यानंतर तो कामोठे येथील सेक्टर ३५ मध्ये कुटुंबासोबत राहू लागला. प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय करण्यासाठी त्याने स्वतःची मोटार खरेदी करून तो मोटार चालक म्हणून व्यवसात करत होता. यादरम्यान कळंबोली पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये अशोकवर अजून एक मारहाणीचा गुन्हा दाखल झाला.

१६ मार्चच्या मध्यरात्री मित्रांसोबत अशोक कामोठे येथील सेक्टर ६ ए मधील सरोवर बारमध्ये दारू व जेवणाचे पार्सल घेण्यासाठी गेल्यावर त्याने हॉटेल व्यवस्थापकाला बाहेरून आलेल्या व्यक्ती धंदा करताय, महिन्याला पाच हजार रूपयांचा हफ्त्याची मागणी केली. यामुळे हॉटेल व्यवस्थापक आणि अशोक व त्याचे अन्य मित्रांसोबत वाद झाला. हॉटेल व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी अशोक व त्याच्या मित्रांना पिटाळून लावले. मात्र, याच वादाचा राग मनात धरून अशोकने दुसऱ्या दिवशी १७ मार्चला तलवार घेऊन हॉटेल व्यवस्थापक उमेश शेट्टीला मारहाण केली.

या मारहाणीचे चित्रिकरण हॉटेलमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर व्यापाऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली. तातडीने या घटनेची गंभीर दखल घेत सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांच्या सूचनेनंतर कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, पोलीस निरीक्षक मनोहर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश दळवी, पोउ प्रतापसिंह चव्हाण, पोह संजय झोळ, पोशि प्रमोद कोकाटे, राजेंद्र इलग यांच्या पथकाने अशोकला पकडले.

## काशीद समुद्रकिनाऱ्यासाठी स्वयंचलित स्वच्छता यंत्र



**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध काशीद समुद्रकिनारा स्वच्छ आणि आकर्षक ठेवण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या पुढाकारातून काशीद ग्रामपंचायतीला स्वयंचलित समुद्रकिनारा स्वच्छता यंत्र उपलब्ध करून देण्यात आले आहे. या यंत्रासाठी सुमारे ७५ लाख रुपये खर्च करण्यात आला असून किनाऱ्यावरील वाढता कचरा लक्षात घेऊन ही सुविधा देण्यात आली आहे.

काशीद समुद्रकिनाऱ्यावर दरवर्षी सुमारे सात लाखांहून अधिक पर्यटक भेट देतात. त्यामुळे प्लास्टिक कचरा, अन्नाचे अवशेष तसेच इतर

### ● स्वच्छतेस मिळणार गती

घाण मोठ्या प्रमाणात साचत होती. सुमारे दोन किलोमीटरहून अधिक लांबीच्या या किनाऱ्याची स्वच्छता राखण्यासाठी मोठ्या मनुष्यबळाची गरज भासत होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नेहा भोसले यांच्या प्रयत्नांतून हे यंत्र उपलब्ध झाले आहे. या यंत्राचे लोकार्पण मुरुड पंचायत समितीचे सभापती निलेश घाटवळ यांच्या हस्ते विधिवत करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, सरपंच संतोष राणे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

यंत्र उपलब्ध झाल्याने समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता अधिक जलद आणि सुलभ होणार असून, काशीदचे पर्यटनस्थळ म्हणून असलेले आकर्षण आणखी वाढेल, असा विश्वास सरपंच संतोष राणे यांनी व्यक्त केला.

### रुग्णसेवेसाठी 'लायन्स गौरव' प्रदान | उल्लेखनीय कार्याचे सर्व स्तरातून कौतुक

# लायन्स क्लबतर्फे अनिल चव्हाण यांचा सन्मान

**। महाड । प्रतिनिधी ।**

**गेली अनेक वर्षे निःस्वार्थ भावनेने रुग्णवाहिका सेवा देणारे महाड येथील अनिल चव्हाण यांना लायन्स क्लब ऑफ महाडतर्फे 'लायन्स गौरव' ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा गौरव प्रदान करण्यात आला.**



सन १९९८ पासून अनिल चव्हाण रुग्णवाहिका चालवत असून, रायगड जिल्ह्यात रुग्णवाहिका सेवा अत्यल्प असताना त्यांनी श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, बाणकोट, मंडणगड, पोलादपूर आणि महाड असा विस्तृत परिसर कव्हर करत अनेक रुग्णांना वेळेवर सेवा दिली. अनेक वेळा पनवेल आणि मुंबईपर्यंत दोन-तीन फेऱ्या करून रुग्णांचे प्राण वाचविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील अपघात, आंबेनळी, सावित्री पूल दुर्घटना तसेच कोरोना काळातही त्यांनी तत्परतेने सेवा बजावली. अपघातग्रस्तांना मदत करताना प्रामाणिकपणा जपत त्यांच्या वस्तूंना हात न लावण्याची स्वच्छ प्रतिमा त्यांनी कायम राखली आहे. पोलीस यंत्रणेलाही त्यांच्या सेवांवर पूर्ण विश्वास असून त्यांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक केले जाते.लायन्स डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संजीव सूर्यवंशी, उपजिल्हाप्रमुख प्रवीण सरनाईक, विजय गनात्रा तसेच लायन्स क्लब महाडच्या अध्यक्षा स्नेहल बुटाला यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. अनिल चव्हाण यांच्या कार्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## पेणकर पाड्यात स्वामींचा प्रकट दिन

**महाड :** श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळ्यानिमित्ताने श्री स्वामी समर्थांची इच्छा ट्रस्ट पेणकर पाडा यांच्यावतीने देवभूमी येथील श्री स्वामी समर्थ मठात श्रींची पूजा आणि अभिषेक, नैवेद्य, महाआरती, महाप्रसाद, श्री स्वामी पालखी सोहळा, खाजना देवी प्रासादिक भजनी मंडळ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हजारो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. याप्रसंगी अनिता पाटील, दिपेश गावंड, श्वेता पाटील, दिपक वालमकर, चेतन भाऊ, विजय मोकल, किशोर भगत, धनाजी पवार, ॲड. नितेश म्हात्रे आदी मान्यवरांनी दर्शनाचा लाभ घेतला.

# निवडक

## संतोष बैलमारेंची आरोग्य केंद्रास भेट



**पाताळगंगा :** नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य व गटनेते संतोष बैलमारे यांनी लोहप येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी रुग्णालयातील सेवा, सुविधा व कर्मचाऱ्यांची कामकाज पद्धती याबाबत सविस्तर माहिती घेतली. भेटीदरम्यान त्यांनी वॉर्ड, औषध वितरण कक्ष आणि उपचार कक्षाची पाहणी केली. केंद्रातील स्वच्छता, व्यवस्थापन तसेच जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापनाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच केंद्राला राज्यस्तरीय प्रमाणपत्र उच्च गुणांसह प्राप्त झाल्याबद्दल कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी औषधांची उपलब्धता, मनुष्यबळाची कमतरता तसेच उपकेंद्रांच्या आवश्यक गरजांविषयी अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली. या भेटीत वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश देशमुख, फार्मसी अधिकारी सोनाली गाढे, प्रयोगशाळा अधिकारी समीकेश पाखरे, नर्स धनश्री शेळके, आरोग्य सेवक महेश तांबडे तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

## ब्राह्मण सभेचा वर्धापनदिन उत्साहात



**पनवेल :** ब्राह्मण सभा नवीन पनवेल या संस्थेचा १९ वा वर्धापनदिन संपन्न झाला. पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहामधे हा सोहळा संपन्न झाला. यानिमित्ताने वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार संपन्न झाला. तसेच कोकण रेल्वेवरील दरोड्याचा प्रयत्न उधळून लावणाऱ्या तिकीट तपासनीस महेश पेंडसे यांचा गौरव करण्यात आला. सभासद कलाकारांनी सादर केलेल्या दोन एकांकिका हे यावर्षीच्या सोहळ्याचे विशेष आकर्षण होते. यंदा सभेच्या वतीने एकांकिका लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अभिजित परांजपे लिखित 'देन अँड नाऊ-ए टेल वुईथ थ्री एंडिंग्स' या एकांकिकेला प्रथम क्रमांक, मानसी कुलकर्णी लिखित 'जय स्त्री आराम' या एकांकिकेला द्वितीय पारितोषिक आणि शेखर अंबेकर लिखित 'वन बाय टू' या एकांकिकेला तृतीय क्रमांकाच्या पारितोषिकाने गौरविण्यात आले. समीर खरे, आणि स्नेहा सोमण यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. सुषमा गोखले आणि श्रीपाद वैशंपायन आणि श्यामनाथ पुंडे यांनी एकांकिकेचे दिग्दिर्शन केले. अदित गोडबोले, गंधार देशपांडे, माधव भागवत यांनी पार्श्वसंगीत दिले. पद्मनाभ भागवत यांनी तंत्रसहाय्य केले. सोहम व्यवहारे यांनी प्रकाशयोजना केली.

## अंबरसावत मंदिराचा वर्धापन दिन साजरा



**कोलाड :** आंबेवाडी बाजारपेठेतील अंबरसावत मंदिराचा तिसरा वर्धापन दिन बुधवार, दि.१८ मार्च रोजी मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. अंबरसावत मंदिराच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले. यानंतर रात्री ९ वाजता श्री समर्थनगर आंबेवाडी येथील तरुणांचा संगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी आंबेवाडी येथील असंख्य ग्रामस्थ, महिला वर्ग व तरुण वर्ग उपस्थित होते.

## महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन

**नवी मुंबई :** ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत 'महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. सिडको प्रदर्शन केंद्र, वाशी येथे २४ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत हे प्रदर्शन भरविण्यात येणार असून, २४ मार्च रोजी उद्घाटन होणार आहे. उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रदर्शनात एकूण ४९० स्टॉल्स उभारले जाणार असून महाराष्ट्रासह इतर राज्यांतील महिला बचत गट, शेतकरी उत्पादक गट आणि विविध उपक्रम सहभागी होणार आहेत. ७० स्टॉल्सचे भव्य खाद्यपदार्थ विभाग हे विशेष आकर्षण ठरणार आहे. यामध्ये राज्यातील पारंपरिक खाद्यपदार्थांसह हातमाग वस्त्रे, लाकडी कलाकुसर, वारली कला, दागिने आणि हस्तकला वस्तू थेट ग्राहकांना खरेदी करता येणार आहेत. यंदा प्रदर्शनात 'व्हिलेज एरिया', आधुनिक छायाचित्रण सुविधा, माहिती फलक तसेच लहान मुलांसाठी विशेष खेळण्याची जागा उपलब्ध करण्यात आली आहे. संपूर्ण प्रदर्शन वातानुकूलित हॉलमध्ये भरविण्यात येणार आहे. ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदी करावी, असे आवाहन निलेश सागर यांनी केले आहे.



ग्रामीण महिलांना मिळणार मोठी बाजारपेठ

## ॲड. रामचंद्र मेंदाडकर यांचे देहदान



**बोर्लीपंचतन :** रायगड जिल्ह्यातील दिघी येथील कोळी समाजात जन्मलेले ॲड. रामचंद्र कानु मेंदाडकर यांनी आपल्या निधनानंतर देहदान करून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मदत व्हावी, या उदात्त हेतूने त्यांनी अंतर्गत शिव येथील रुग्णालयात देहदानाची नोंदणी केली असून त्यांना ओळखपत्रही देण्यात आले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. दिघी येथील प्राथमिक शाळेतून सुरुवात करून श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील मोहनलाल सोनी विद्यालयात त्यांनी पुढील शिक्षण घेतले. मुंबईत दिवसा नोकरी आणि रात्री शिक्षण अशा कष्टप्रद प्रवासातून त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून वकील म्हणून आपली ओळख निर्माण केली. कोळी समाजातील बांधवांना महादेव कोळी दाखले मिळवून देण्यासाठी त्यांनी लढा दिला.वकिलीच्या माध्यमातून आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्याचे कार्यही त्यांनी केले. श्रीवर्धन मतदारसंघातून त्यांनी विधानसभेची निवडणूकही लढवली होती. परदेशातही भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान त्यांना मिळाला होता. कंबोडिया येथे त्यांनी देशाची बाजू भक्कमपणे मांडत भारताचा गौरव वाढवला. त्यांनी आपल्या तिन्ही मुलांना वैद्यकीय शिक्षण देऊन कुटुंबासह मुंबईतील कुर्ला येथे गरजूंसाठी मोफत वैद्यकीय सेवा सुरू ठेवली आहे.

# पेण पंचायत समितीत शिस्तभंगाचा कळस

## ''हम नहीं सुधरेंगे''चा कारभार उघड

| पेण | प्रतिनिधी |

''कुत्र्याची शेपुट नळीत घातली तरी ती वाकडीच'' ही म्हण पेण पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर अक्षरशः लागू पडत असल्याचे चित्र समोर आले आहे. दोनच दिवसांपूर्वी नव्याने निवडून आलेल्या सभापती, उपसभापती आणि लोकप्रतिनिधींनी कर्मचाऱ्यांना वेळेवर उपस्थित राहण्याची स्पष्ट तंबी दिली होती. मात्र, त्या सूचनांकडे सरळ दुर्लक्ष करत ''हम नहीं सुधरेंगे'' अशीच भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतल्याचे वास्तव समोर आले आहे.



बुधवारी सकाळी ९.५० वाजता कार्यालयात पाहणी केली असता संपूर्ण पंचायत समिती कार्यालयात अक्षरशः शुकशुकाट होता. बोटावर मोजण्याइतकेच कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले. पशुसंवर्धन विभाग पूर्णपणे बंद होता, तर शिक्षण विभागातही एकही कर्मचारी हजर नव्हता. कृषी विभागात केवळ एक कर्मचारी, अर्थ विभागात एक, सामान्य प्रशासन विभागात तीन, ग्रामपंचायत विभागात तीन आणि बांधकाम विभागात दोन कर्मचारी उपस्थित होते.

एकूण ३६ कर्मचाऱ्यांपैकी फक्त १६ कर्मचारीच कार्यालयात उपस्थित होते, तर उर्वरित कर्मचाऱ्यांचा कोणताही ठावठिकाणा नव्हता. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, कार्यालयात बसवलेली बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा पूर्णपणे बंद अवस्थेत असून, ती केवळ दिखाव्यासाठी असल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ''दहा मिनिटांत सर्व कर्मचारी हजर होतील'' असे सांगितले. मात्र, १५ मिनिटे उलटूनही परिस्थितीत कोणताही बदल झाला नाही. कार्यालयीन शिस्तीचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र असताना, या कर्मचाऱ्यांच्या उशिरा येण्याच्या सवयीवर नव्याने निवडून आलेले लोकप्रतिनिधी आळा घालणार का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.



(छायाचित्र : संजय गायकवाड)

# कर्जतमध्ये रमजान ईद साजरी

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरामध्ये रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

रमजान पर्वकाळात मुस्लीम बांधवांनी महिनाभर निर्जळी उपवास करत अल्लाहची उपासना (इबादत) केली. यावर्षी संपूर्ण रमजान पर्व मार्च महिन्यात उन्हाच्या तीव्रतेत पार पडले, तरीदेखील आबालवृद्धांचा उत्साह बघावयास मिळाला. कर्जत शहरातील सुन्नी जामा मस्जिदमध्ये नवीन कपडे परिधान करून सुगंधी अत्तर लावून मुस्लिम बांधव ईद साजरी करण्यासाठी सकाळी मस्जिदमध्ये पोहचले होते. नमाज अदा झाल्यावर मुस्लिम बांधवांनी मशिदीबाहेर एकमेकांना मिठ्या मारून शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलीस निरीक्षक उमेश पाटील हे मस्जिदजवळ स्वतः हजर होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## निवडक

### आर्या जाधव यांच्या कार्यालयाचे उद्घाटन



**पनवेल** : महाविकास आघाडीच्या नगरसेविका आर्या जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त कापड बाजार येथे उत्साहात पार पडले. या कार्यालयाचे उद्घाटन बाळाराम पाटील आणि शिरीष घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, गटनेते केतन भगत, नगरसेवक लतीफ शेख, प्रकाश म्हात्रे, नगरसेविका मनीषा म्हात्रे, दीपक घरत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांचे नवोदय प्रवेश परीक्षेत यश

**तळा** : नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या या यशामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. या परीक्षेत आरुषी संतराम बोडखे (तळे मराठी शाळा) हिने ९३ टक्के गुण मिळवत अव्वल कामगिरी केली. मंथन सचिन पात्रे (चरई बुद्रुक) याने ९२ टक्के गुण मिळवले, तर प्रार्थना दर्शन ठमके (तळे मराठी) हिने ९० टक्के गुणांसह यश मिळवले. तसेच मानवी लालसिंग पावरा (आनंदवाडी) हिने ८९ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या सर्व विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली असून त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे तळा तालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीला नवी दिशा मिळाली असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.





### यादव-गवळी समाज संघटनेचा वर्धापन दिन

**म्हसळा** : ध्यास गवळी समाजाच्या उत्कर्षाचा,वारसा भगवान श्रीकृष्णाचा आणि एकच ध्येय समाजकार्याचाहा मूलमंत्र घेऊन कार्यरत असलेल्या यादव-गवळी समाज संघटना नवी मुंबई-पनवेल विभागाचा तृतीय वर्धापन दिन सोहळा अध्यक्ष गणेश साबळे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्ट या शिखर संस्थेचे विश्वस्त प्रकाश रिकामे, कुसुम म्हात्रे, ॲड. योगिता भगत, भूपेंद्र पाटील, बाळू भोर, विजय दिवेकर यांच्यासह प्रकाश रिकामे, प्रकाश नटे, सुहास महागावकर, भरत रिकामे,अनिल लटके आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी अध्यक्ष गणेश साबळे, उपाध्यक्ष नरेश काते, किशोर लाड, अनिल काते, सुनिल लटके, देवेंद्र काते, सुदिन तटकरे, सुनील वाजे, मेगणेश वाजे, संदेश काते, अशोक काते, किशोर तांबडे, दिनेश महाडीक, शैलेश काते, बाळकृष्ण महाडीक आदींसह महिला कार्यकारिणीच्या अध्यक्षा हेमा तटकरे, उपाध्यक्षा अंकिता काते, स्वाती लटके, साक्षी काते, नितीशा काते, नेहा महाडीक, स्मिता साबळे, समृद्धी काते, ज्योत्स्ना रिकामे, अनुष्का काते,अमृता लटके, रणिता वाजे, विनिता महाडीक, अक्षता रिकामे यांनी मेहनत घेतली.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **भारत पेट्रोल पंप चेंढरे** अलिबाग बायपास येथे कामासाठी मुले पाहिजेत व ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. शिक्षण B.Com
७४४७४०४४११/७४४७४०४४३८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पाली नगरपंचायतीतील विविध समितींचे सभापती पद रिक्त

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील पाली नगरपंचायतीतील विविध समित्यांचे सभापतीपद गेल्या दीड महिन्यापासून रिक्त आहे. १० फेब्रुवारी २०२६ रोजी समिती सभापतींचा कार्यकाल संपल्यानंतर आजपर्यंत नवीन सभापतींची निवड झालेली नाही.

महिला व बालकल्याण समिती, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, आरोग्य समिती, बांधकाम समिती अशा अनेक महत्त्वाच्या समित्यांचे सभापती पद रिक्त असल्यामुळे नगरपंचायतीच्या कामकाजावर परिणाम होत आहे.




(छायाचित्रः गौसखान पठाण)

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या समित्या कार्यरत नसल्याने निर्णयप्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत.

गेल्या दीड महिन्यात सभापती निवडीसंदर्भात दोन वेळा बैठक घेण्यात आली; मात्र कोरम पूर्ण न झाल्यामुळे निवड प्रक्रिया पार पडली नाही. परिणामी समित्यांचे सभापती पद रिक्तच राहिले आहे.

नगरपंचायतीच्या विविध समित्या ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजातील महत्त्वाची कडी मानली जाते. या समित्यांमार्फत नागरिकांच्या मूलभूत गरजांशी संबंधित निर्णय घेतले जातात. मात्र, सभापती पद रिक्त असल्याने नागरिकांच्या तक्रारी व मागण्यांवर ठोस निर्णय घेण्यात विलंब होत आहे.

पाली नगर पंचायतीच्या राजकारणातील गोंधळामुळे नागरिकांना मूलभूत सेवांचा लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत. नागरिकांनी या पदांची निवड तातडीने करून समित्यांचे कामकाज सुरळीत करण्याची मागणी जोर धरत आहे.



# म्हसळ्यात स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात

| म्हसळा | प्रतिनिधी |

सालाबादप्रमाणे याही वर्षी म्हसळा येथील श्री स्वामी समर्थ मठामध्ये स्वामींचा प्रकट दिन उत्साही आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. म्हसळा शहर आणि परिसरातील स्वामी भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसादाचा लाभ घेतल्यानंतर श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिनाच्या सोहळ्याची सांगता करण्यात आली. सर्व स्वामी भक्तांनी मेहनत घेतली.



# राज्य पुरस्कार परीक्षेत दादर शाळेचे यश

| माथेरान | प्रतिनिधी |

मुंबई (दादर) येथील अवर लेडी ऑफ सॅल्वेशन हायस्कूल इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी राज्य पुरस्कार परीक्षेत यश मिळवत शाळेचे नाव उज्वल केले आहे.

शाळेच्या स्काऊट पथकातील ११ विद्यार्थ्यांनी राज्य स्काऊट पुरस्कार परीक्षेत चांगल्या गुणांनी यश संपादन केले. शाळेचे स्काऊट मास्टर मोतेस नोरोन्हा व सुनील श्रीराम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुंबई मध्य भारत स्काऊटच्या अधिकारी अरुणा बिरारी, शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ. सिस्टर रोमाना फर्नाडीस, सुपरवायसर मिस मीना पडवळ यांनी स्काऊट विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# उन्हाळ्याच्या झळा झाल्या असह्य

## रणरणत्या उन्हामुळे नागरिक हैराण

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

दिवसेंदिवस आता उन्हाची तीव्रता खुपच जाणवू लागली असल्यामुळे वातावरणात गेल्या काही दिवसांपासून बदल होऊन अचानक तापमान वाढल्याने सूर्य आग ओकू लागला की काय? असा प्रश्न विद्यार्थी पालक वर्ग, कामगार, वयोवृद्ध यांना पडले आहे. यामुळे घराबाहेर पडताना छत्री, स्कार्फ, गॉगल, टोपी आदी साधनांचा वापर करावा लागत आहे. या उन्हामुळे प्रत्येक व्यक्तीची अंगाची लाही-लाही होत आहे. यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत.

सकाळी दहा वाजल्या पासूनच उन्हाच्या तडाख्यामुळे शरिरातून घामाच्या धारा वाहू लागत आहे. यामुळे शरीरातील पाणी कमी होऊन



डोकेदुखी, चिडचिडेपणा, थकवा असा त्रास जाणवू लागले आहे. उष्णतेशी संबंध आल्यास उष्माघात होतो. थकवा येणे, ताप येणे, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, चक्कर येणे, निरुत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बैचेनी व अस्वस्थता, बेशुध्दावस्था ह्या उन्हाममुळे निर्माण होत आहे.

तालुक्यात उन्हाचा पारा वाढलेला दिसत असून, या रखरखत्या उन्हाच्या कडाक्याने नागरिक कमालीचे हैराण झाले. उन्हापासून बचाव करण्याकरिता पांढरे शेले व शुभ्र खादीच्या कपड्यांमध्ये वाढ झाली आहे. मार्च महिन्याच्या प्रारंभीच वातावरणात आणखी चढ-उतार होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे उन्हाळ्याच्या झळा नागरिकांना असह्य होत आहेत.

> **रणरणत्या उन्हामुळे घराच्या बाहेर पडणे अशक्य होत असून, तरी काही महत्त्वाच्या कामासाठी जावे लागते. मात्र, या उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी स्कार्फ, गॉगलचा आधार घ्यावा लागतो.**
> **- अन्वी जाधव, विद्यार्थी**

# अवैध डंपिंगने पोयनाड गुदमरले

| पोयनाड | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील सर्वांत गजबजलेल्या आणि सुप्रसिद्ध बाजारपेठांपैकी एक म्हणून पोयनाड गावाची ओळख आहे. अलिबाग तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्यातून नागरिक मोठ्या संख्येने पोयनाड येथे मिरची-मसाला व अन्य गरजेच्या वस्तू होलसेल दरात खरेदी करण्यासाठी येतात. दर सोमवारी भरणारा पोयनाडचा आठवडी बाजार जिल्हाभर प्रसिद्ध आहे. मात्र, अशा नावाजलेल्या गावाची आज परिस्थिती घाणीचे साम्राज्य अशी झाली असून, पोयनाडच्या वेशीवर बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेल्या डंपिंग ग्राउंडमुळे नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य झाले आहे.

स्थानिकांच्या आरोपानुसार, येथे मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असून, दुर्गंधीमुळे परिसरातील



- **ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह**
- **वारंवार आग लावल्यामुळे परिसरात धुराचे पसरताहेत ढग**

नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या अवैध डंपिंग ग्राउंडच्या शेजारीच झुंझारचे भव्य क्रीडांगण असून, जिल्हाभरातून खेळाडू क्रिकेट आणि कबड्डी स्पर्धांसाठी येथे येतात. परिसरात मोठ्या हौसिंग सोसायट्या, हॉस्पिटल तसेच हॉटेल-रिसॉर्टही आहेत. त्यामुळे या दुर्गंधीचा फटका स्थानिकांसह बाहेरून येणाऱ्या नागरिकांनाही बसत आहे.

कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे चिकनगुनिया, मलेरिया आणि डेंग्यूसारख्या साथींचा धोका निर्माण झाला आहे. त्यातच या डंपिंग ग्राउंडला वारंवार आग लावली जात असल्याने परिसरात सतत धुराचे ढग पसरतात. परिणामी खेळाडू, नागरिक आणि ये-जा करणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

याहूनही धक्कादायक बाब म्हणजे स्थानिक ग्रामपंचायत आणि प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

### आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने तात्काळ कारवाई करून हे डंपिंग ग्राउंड हटवावे, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करू, असा स्पष्ट इशारा स्थानिकांनी दिला आहे. पोयनाडची अशी दुर्दशा होत असताना प्रशासनाचे डोळे उघडणार की नाही? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



# सावरसईत स्वामी समर्थ प्रकटदिनी

| खरोशी | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील सावरसई येथील स्वामी समर्थ मठात स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त भाविकांची अभूतपूर्व गर्दी उसळली. शुक्रवारी (दि.२०) मार्च रोजी साजऱ्या झालेल्या या उत्सवात हजारो भक्तांनी अत्यंत श्रद्धा आणि भक्तिभावाने सहभाग घेतला. यावेळी अभिषेक, आरती, पालखी सोहळा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मठ परिसरात दिवसभर भक्तिगीत, नामस्मरण आणि जयघोषाने उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

पेण तालुक्यातील सावरसई येथील स्वामी समर्थ मठही श्रद्धेचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले असून दरवर्षी येथे हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याप्रसंगी मठाच्या ट्रस्टतर्फे तीर्थप्रसाद व महाप्रसादाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

## दोनदा गाड्या थांबत असल्यामुळे गैरसोय | पंकज ओसवाल यांच्याकडून पाठपुरावा

# रेल्वे प्रवाशांचे हाल वर्षअखेरीस थांबणार?

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबत असल्यामुळे प्रवाशांचे हाल होतात. कधी सामान फलाटावर राहते, तर कधी प्रवासी घाईत गाडी पकडताना पडून अपघात होऊ शकतो. ही गैरसोय डिसेंबर २०२६ नंतर होणार नाही. कारण, कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी वाढविण्याचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे रेल्वे प्रशासनान सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांना लेखी कळविण्यात आहे.



(छायाचित्रः संजय गायकवाड)

कर्जत रेल्वे स्थानकावर एकूण तीन फलाट व एक इएमयु फलाट आहे. फलाट क्रमांक एकवर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या येत असतात.

परंतु, या फलाटाची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे खूप धावपळ व हाल होतात. या गडबडीत अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकतेच कर्जत रेल्वे स्थानकावर डब्याची स्थिती दर्शविणारे छोटे इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. दोन वेळा गाडी थांबत असल्याने रेल्वे प्रशासनाला एकाचं ठिकाणी डबे दर्शविणारे दोन इंडिकेटर्स बसवावे लागले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो व कधी कधी गाडी चुकते, तर कधी सामान फलाटावर राहते. गाडी पकडण्याच्या नादात फलाटावर प्रवासी पडतसुद्धा आहेत.

लांब पल्ल्याच्या जास्त डब्यांच्या गाड्या कर्जत रेल्वे स्थानकातील एक नंबर फलाटावर दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवाशांची धावपळ होत असे. याबाबत पंकज ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता फलाटाची लांबी वाढविण्यात येणार असून, हे काम फेब्रुवारी २०२६ पूर्ण होणार असल्याचे कळविले होते. परंतु, सदर काम फेब्रुवारी २०२६ परंतु न झाल्यामुळे ओसवाल यांनी पुन्हा रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने नॉन-इंटरलॉकिंगचे काम पूर्ण झाल्यावर कर्जत प्लॅटफॉर्मचा सीएसएमटी टोकाकडील विस्तार करण्यात येईल.

यासाठी रेल्वे आयुक्तांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. काम पूर्ण होण्याची अंदाजित तारीख डिसेंबर २०२६ आहे. असे ओसवाल यांना कळविले आहे.

# पनवेल रेल्वे स्टेशन परिसराचा श्वास कोंडतोय

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

**जंक्शन होत असलेल्या पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात सध्या बेकायदेशीर झोपड्या तसेच घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या ठिकाणाहून ये-जा करणाऱ्या प्रवासी, नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.**



पनवेल रेल्वे स्थानक परिसरातून तक्काकडे जाणाऱ्या रस्त्यावरील फुटपाथवर अनेक बेकायदेशीर झोपड्या उभारण्यात आले आहेत. त्यामुळे रेल्वे स्टेशन परिसराचा श्वास कोंडला आहे. फुटपाथवरच अनोळखी नागरिकांनी आपल्या मुलाबाळांसह संसार थाटल्याने पादचाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे. मात्र, पनवेल महानगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात अनेक मोठमोठ्या इमारती उभ्या राहात आहेत. याच रेल्वे स्टेशन परिसरातून अनेक नागरिक कामानिमित्त हजारोंच्या संख्येने ये-जा करत असतात. पनवेल हे जंक्शन रेल्वे स्टेशन होत आहे, मात्र या स्टेशनच्या आजूबाजूच्या परिसरात बेकायदेशीर झोपड्या उभ्या राहात आहेत. त्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्या ठिकाणी झोपड्यांमध्ये राहणारे नागरिक कुठून आले आणि कोण आहेत याचादेखील थांगपत्ता नाही. त्यामुळे गुन्हेगारीच्या घटना वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## ● परिसरात घाणीचे साम्राज्य

पनवेल महानगरपालिका आणि पनवेल शहर पोलिसांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पनवेल शहराचा झपाट्याने विकास होत असताना रेल्वे स्टेशन परिसरात बकालीकरण सुरू असताना प्रशासन गप्प का, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

फूटपाथवर उभारण्यात आलेल्या बेकायदेशीर झोपडपट्टीतील मुले याच ठिकाणी असलेल्या रेल्वे स्टेशनजवळील सर्कलजवळ उभे असतात. त्यामुळे येण्या-जाणाऱ्या प्रवाशांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. अनेकदा प्रवाशांची वाटदेखील अडवल्याच्या घटना ताज्या आहेत.

## विरलेंच्या प्रशासक नियुक्तीला आव्हान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत पंचायत समिती सदस्य महेश विरले यांची कोल्हारे ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी करण्यात आलेली नियुक्ती वादाच्या भोवऱ्यात सापडली असून, या निर्णयाविरोधात माजी सदस्य विजय हजारे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे 'आपले सरकार' पोर्टलवर तक्रार दाखल केली आहे. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार, मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांची नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार कोल्हारे ग्रामपंचायतीत माजी सरपंच तसेच सध्या पंचायत समिती सदस्य असलेल्या महेश विरले यांची प्रशासकपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र, एकाच वेळी दोन पदांवर कार्यरत राहणे कायदेशीर नसल्याचा दावा करत विजय हजारे यांनी या नियुक्तीवर आक्षेप घेतला आहे.

# नेरळ नळपाणी योजनेस दिलासा

## ● जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे यांचा यशस्वी पुढाकार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**




कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीची नळपाणी योजना थकीत वीज देयकांमुळे अडचणीत सापडली होती. वीज बिल थकल्याने कोणत्याही क्षणी वीज जोडणी खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे यांनी पुढाकार घेत यशस्वी मध्यस्थी करत नळपाणी योजना सुरळीत ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ग्रामपंचायतीकडून महावितरणकडे २० लाख रुपये जमा करण्यात आल्याने वीजपुरवठा पुन्हा सुरू झाला आहे.

नेरळ ग्रामपंचायत क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना ही थकीत वीज देयकांमुळे सतत चर्चेत होती. महावितरणकडून थकबाकी वसुलीसाठी वीज जोडण्या खंडित करण्याची कारवाई सुरू असताना नेरळच्या पाणीपुरवठा योजनेचीही जोडणी तोडण्यात आली होती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात डिझेलवर मोटार चालवून पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे व पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांनी ग्रामपंचायत कार्यालयात बैठक घेत आर्थिक तोडगा काढण्याचे प्रयत्न केले. त्यानंतर सुनीता मोरे यांनी गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांची भेट घेऊन प्रशासक व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांशी चर्चा घडवून आणली. यावेळी नळजोडण्यांबाबत कठोर भूमिका घेऊन थकबाकी कमी करण्याचे, तसेच मिळणाऱ्या निधीतून कर्मचाऱ्यांचे वेतन भागविण्याचे निर्देश देण्यात आले.

ग्रामस्थांना प्रशासनाच्या त्रुटींचा फटका बसू नये, यासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली. गटविकास अधिकाऱ्यांनीही संबंधितांशी चर्चा करून मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार ग्रामपंचायतीने महावितरणकडे २० लाख रुपयांची थकबाकी भरली असून, उर्वरित देयके टप्प्या-टप्प्याने भरण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

## मानसची नवोदय विद्यालयासाठी निवड



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा सन २०२५-२६ मध्ये शाळेचा विद्यार्थी मानस चव्हाण याने रायगड जिल्हा गुणवत्ता यादीत १७ वा क्रमांक पटकावून नवोदय विद्यालयातील आपला प्रवेश निश्चित केला आहे. सावरोली शाळेच्या इतिहासामध्ये नवोदयसाठी पात्र ठरलेला मानस हा पहिलाच विद्यार्थी ठरला असून, या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे.

शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर मानसीने यश मिळवले आहे. शाळेचे मुख्याध्यापक बळीराम चव्हाण, दादासाहेब मुंजाळ, नारायण गाडे, धनाजी थिटे, जगदीश मोहने, अंकिता चोगुले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

शाळेतील शिक्षकांच्या विशेष प्रयत्नांमुळेच ग्रामीण भागातील विद्यार्थी जिल्हा स्तरावर चमकत असल्याचे चित्र दिसत आहे.

## महाविद्यालयात ग्राहक हक्क दिन

**उरण :** कोकण ज्ञानपीठचे उरण वाणिज्य कला महाविद्यालय वाणिज्य विभाग व अजीवन अध्ययन निरंतर व विस्तार विभागातर्फे उरण महाविद्यालयामध्ये जागतिक ग्राहक हक्क दिन प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनानुसार साजरा करण्यात आला. जागतिक ग्राहक हक्क दिनाचे उद्दिष्टे व महत्त्व प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रस्तावनेत स्पष्ट केले. ग्राहक हा राजा आहे व त्याचे कायद्याने दिलेले मूलभूत हक्क याबाबत विश्लेषण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रवींद्र चव्हाण, साकलेन डाखवे, खुशी शर्मा, देवयानी खैरनार या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# गाढी नदी प्रदूषणमुक्ती फक्त कागदावरच

## ● प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



(छायाचित्र : राजेश डांगळे)

पनवेल परिसरातील गाढी नदी गेल्या अनेक वर्षांपासून प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेली असतानाही प्रशासनाकडून केवळ घोषणाबाजीच होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. गुढीपाडव्याच्या निमित्ताने मोठ्या गाजावाजात नदी प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प जाहीर करण्यात आला होता, मात्र त्यानंतर प्रत्यक्षात कोणतीही ठोस उपाययोजना झालेली दिसून येत नाही.

दरम्यान, अनेक अधिकारी बदलले, विविध योजना जाहीर झाल्या, परंतु गाढी नदीची स्थिती 'जैसे थे'च आहे. ऋतू बदलले, परिस्थिती बदलली, पण नदीतील घाण, दुर्गंधी आणि साचलेला कचरा कायमच आहे. नदीकाठच्या नागरिकांना अस्वच्छता, दुर्गंधी आणि आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. "नदी स्वच्छतेचे उपक्रम केवळ दिखावा ठरले का?" असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

"माझ्यासाठी कुणाकडे वेळ नाही का?" अशी जणू हाकच गाढी नदी प्रशासनाला देत आहे. आता तरी संबंधित यंत्रणांनी जागे होऊन केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कृती करावी आणि गाढी नदीला खऱ्या अर्थाने प्रदूषणमुक्त करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पांडुरंग भागु खताळ व १, रा. खेमवाडी, ताडगाव, ता. सुधागड, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-ताडगाव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|
| ७३/१ | ५-९९-०० | २.०० |
| पैकी ०-६०-०० हे.आर. | | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २३/०३/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळेतील विविध शैक्षणिक उपक्रम राबविणारे व त्यातून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे उपक्रम राबविणारे गुणवंत विद्यार्थी यांचा गुणगौरव सिप्ला फाऊंडेशन यांच्यावतीने करण्यात आला.

पंचायत समिती खालापूर यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत उत्कृष्ट नियोजन करून विद्यार्थी यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला होता. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता विकास स्पर्धा यात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांची गुणवत्ता सिप्ला फाऊंडेशन यांच्यावतीने तपासण्यात आली. गुणवत्ता



विकास स्पर्धेसाठी सिप्ला फाऊंडेशन यांच्यावतीने फाऊंडेशनचे विकास शिंदे, सनी म्हात्रे यांनी स्पर्धेत प्राविण्य मिळवलेल्या तालुक्यातील १०३ विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, भेटवस्तू व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास कृष्णा पारंगे, भाई शिंदे, रेश्मा पाटील, पंचायत समिती सदस्यता देवयानी देशमुख, गटशिक्षणाधिकारी दीपा परब, सुरेश चव्हाण, शिक्षक उपस्थित होते.

# संतुलित सकस आहार पाककला स्पर्धा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक वाढीसाठी आहारातील पोषक घटकांचे महत्त्व पटवून देण्यासाठी मोठीजुई येथील राजिपच्या शाळेत संतुलित सकस पोषण आहार अभियानांतर्गत मात पालकांसाठी विशेष पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

बदलत्या जीवनशैलीत मुलांच्या डब्यातून जंक फूडऐवजी घरचा पौष्टिक आहार जावा, तसेच अन्न घटकावर अधारीत संकल्पना स्पष्ट होण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत माता पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. स्पर्धकांनी तृणधान्ये, कडधान्ये आणि पालेभाज्यांचा तसेच मासे, अंडी, चिकन यांचा कल्पक वापर करून विविध पदार्थ सादर केले. विशेषतः वाढत्या वयातील मुलांसाठी आवश्यक असलेल्या कर्बोदकांचे ऊर्जादायी स्त्रोत, स्नायूंच्या वाढीसाठी महत्त्वाची असलेली प्रथिने आणि रोगप्रतिकारशक्ती वाढविणारी जीवनसत्त्वे यांचा समतोल कसा राखावा, याचे प्रात्यक्षिकच या निमित्ताने पाहायला मिळाले. या कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत, केंद्रप्रमुख शंकर पाटील, दर्शन पाटील, महेश गावंड, राजेश चोरले, लक्ष्मण भोईर, अमता भोपी यांच्यासह व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अविनाश नवाळे, कौशिक ठाकूर, विश्वनाथ गावंड, यतीन म्हात्रे, अंकुश पाटील, काजल पाटील यांनी परिश्रम घेतले.

### शुद्धीपत्रक

तमाम जनतेस या शुद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की,

दि. २२/०३/२०२६ रोजीच्या दैनिक कृषिवल या वर्तमानपत्राच्या पान क्र. ७ वर मौजे सातिर्जे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकतीच्या जाहिर नोटीसीमध्ये अनावधानाने गट नं.१७३/१/७ या मिळकतीचे संपूर्ण वर्णन नमूद करण्यात आले आहे. ते दुर्लक्षित करुन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे वाचण्यांत यावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हि. नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| सातिर्जे | १७३/१/७ | ०-४७-३० | १०.९८ |
| | | पो.ख.०-०७-७० | |
| | | ०-५५-०० | |

**पैकी उत्तरेकडील ० हेक्टर २२.०० आर एवढी मिळकत. त्यामध्ये जाण्या-येण्याकरीता गट नं. १७३ या मिळकतीमधून सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यावरुन वहिवाटीच्या निरंतर हक्कासह.**

ता. २२/०३/२०२६ रोजीच्या जाहीर नोटीसीतील उर्वरित मजकुर जसाच्या तसा वाचण्यात यावा.

अलिबाग
तारीख : २३/३/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. पंढरीनाथ लक्ष्मण पाटील व इतर ३ यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**बिनशेतीजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे नालधे, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेतीजमीन मिळकत सर्व्हे नं ७९/८१ एकुण ०.०५.९२ गुंठे क्षेत्र जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २३/०३/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटिसने असे कळवण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे ओलमण, तालुका. कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्रीमती लीलाबाई गणू ढोंगे, श्री बाबू बापू भवारी, श्री विठ्ठल बापू भवारी, श्रीमती अनिता संतोष करोटे, श्री दत्तात्रेय शिवराम कोकाटे, श्री भाऊ शिवराम कोकाटे, श्री रतन शिवराम कोकाटे, श्रीमती शोभा शंकर भोते, श्रीमती प्रतिभा रोहित मोडक, यांच्या सामाईक क्षेत्राची असून त्यांचा कडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मौजे ओलमण, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १३७ | ३/अ | जमीन विक्री करणार यांचा मालकीचे क्षेत्र ६.०३.०० यापैकी विक्री करण्याचे ठरलेले क्षेत्र ४.००.०० | ३.०७ |

तरी सदर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा आमचे अशिलांच्या वर नमूद केलेल्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसात लेखी पुराव्या सह कळवावे. वरील मुदतीस कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कुठल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी ते हक्क हितसंबंध आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमच्या अशिलांच्या वर नमूद केलेल्या व्यवहारास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार सर्व शासकीय परवानगी घेऊन पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेण्यात येणार नाही.

ठिकाण: कर्जत
तारीख: २३/०३/२०२६

सही /-
**अधिवक्ता पौर्णिमा आनंद जाधव**
मो नं. ९७६४५४७६४३
पत्ता- मार्वल शिप्रा मुद्रे बुद्रुक कर्जत

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटिसने असे कळवण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे ओलमण, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री नथु नानु व्हला, श्री रामचंद्र नानु व्हला, श्री भगवान देहु पारधी यांच्या सामाईक क्षेत्राची असून त्यांचा कडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे ओलमण, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ११६ | १/अ | ३.५७.०० | १.४२ |

तरी सदर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा आमचे अशिलांच्या वर नमूद केलेल्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीस कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कुठल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी ते हक्क हितसंबंध आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमच्या अशिलांच्या वर नमूद केलेल्या व्यवहारास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार सर्व शासकीय परवानगी घेऊन पूर्ण करतील.
मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेण्यात येणार नाही.

ठिकाण : कर्जत
तारीख : २३/०३/२०२६

सही /-
**अधिवक्ता. पौर्णिमा आनंद जाधव**
मो नं. ९७६४५४७६४३
पत्ता - मार्वल शिप्रा मुद्रे बुद्रुक कर्जत

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)

ज.म.र.अर्ज ४१७/२०२५

**जाहीरनामा**

अर्जदार श्री. शहादत हसन खान, रा. मु. पो. मांडला, ता.मुरुड, जि. रायगड, यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये मृत्यु नोंदणी मिळणेकरीता अर्जदार यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांचा जन्म दि. १४/२/१९६४, रोजी, राहत्या घरी मौजे मांडला, ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांस त्यांचे जन्मप्रमाणपत्र आवश्यक होते. परंतु सदरहु नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, ता.मुरुड-जंजिरा जि.रायगड यांचे अभिलेखामध्ये आढळून आलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद अभिलेखावर घेण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास या जाहिरनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्या तर सदरहु न्यायालय त्याला मागणीप्रमाणे जन्म दाखला देण्याचे आदेश देईल.

आज दिनांक १०/३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

### मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड

**ई-निविदा सुचना सन २०२५-२६**

**म्यु.जा.क्र. १९८१/ई-निविदा/मु.न.प. २०२५-२०२६**

मा. प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीत नमो उद्यान विकसित करणे. या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती : http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २३/०३/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक ३०/०३/२०२६ आहे.

दिनांक :-२२/०३/२०२६

**शिक्का**

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – केआरसीएलच्या रत्नागिरी विभागांतर्गत ओएचई/पीएसआय संरचनांचे रंगकाम, मास्ट वर स्टेन्सिलिंग, एटीडीचे रंगकाम, टीएसएस, एसपी, एसएसपी यांच्या स्विच यार्डमधील फेन्सिंग पॅनल्सचे रंगकाम तसेच सुरक्षा फलकांची तरतूद करणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/21/2025 दिनांक 23/03/2026, अंदाजित खर्च** – ₹ 59,70,685/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 1,19,400/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 13/04/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक श्री. सागिर इब्राहिम नाचण, रा. चिकणपाडा, पो. पोशिर, ता. कर्जत, जि. रायगड, आधार क्र. ८००६ ४९४२ २८४० यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदर मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे पोशिर, ता. कर्जत, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं.. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १४८ | २/ब | ०-२३-३० | २-६१ |

तरी वर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २३/०३/२०२६

**ॲड. तुषार रामचंद्र भवारे**
श्रावणधारा को. ऑप. हौ. सो. ब्राम्हण आळी,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८५०८००८१३

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### विराट कोहलीचा सहकाऱ्यांना कानमंत्र

**बंगळूरू** : गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळूरचा संघ यंदाच्या मोसमात आयपीएलचे जेतेपद राखण्यासाठी सज्ज झाला आहे. या संघातील स्टार अन् दिग्गज खेळाडू विराट कोहली याने याप्रसंगी सहकाऱ्यांना सल्ला देताना म्हटले की, सराव सत्रातील एक मिनिटही वाया घालवू नका. तो पुढे म्हणाला की, आपण मागील दोन ते तीन मोसमांमध्ये प्रचंड मेहनत केली. त्यानंतर गेल्या वर्षी विजेतेपद पटकावता आले, परंतु आता आव्हान अजून कठीण असणार आहे. कारण इतर संघ आपल्यासमोर आणखी जोमाने मैदानात उतरताना दिसतील. हे दिवस वाया घालवायचे नाहीत.



आपण इतरांपेक्षा पुढे राहायला हवे. त्यामुळे आतापासूनच पूर्ण तयारी करा आणि पुढील अडीच महिन्यांसाठी प्रयत्नांची शिकस्त करा, असेही विराट कोहलीने आवर्जून नमूद केले. दरम्यान, रॉयल चॅलेंजर्स बंगळूरचा सलामीचा सामना २८ मार्च रोजी सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे. ही लढत बंगळूरच्या घरच्या मैदानावर अर्थातच एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहे.



### भारताची आशियाई पात्रतेसाठी तयारी

**नवी दिल्ली** : हॉकीच्या मैदानावरील भारताची ताकद पुन्हा एकदा जगासमोर दिसू लागली आहे. कझाकस्तानचा वरिष्ठ पुरुष हॉकी संघ आगामी आशियाई हॉकीच्या पात्रतेच्या तयारीसाठी भारतात दाखल झाला असून, सोनीपतच्या मैदानावर त्यांच्या रणतयारीला जोरदार सुरुवात झाली आहे. १० ते २१ मार्चदरम्यान भारत क्रीडा प्राधिकरणाच्या उत्तर प्रादेशिक पेंद्रात होणारे हे प्रशिक्षण शिबीर आशियाई क्रीडा स्पर्धा पात्रता फेरी २०२६ च्या दृष्टीने अत्यंत निर्णायक मानले जात आहे. भारतातील उच्च दर्जाची हॉकी सुविधा, वेगवान खेळशैली आणि स्पर्धात्मक वातावरण, याचं आकर्षण आता परदेशी संघांनाही खेचत आहे. त्यामुळे कझाकस्तान संघासाठी हे शिबीर केवळ सराव नाही, तर स्वतःला नव्याने घडवण्याची मोठी संधी ठरणार आहे. कझाकस्तानच्या प्रशिक्षक ओल्गा उरमानोवा यांनी भारतातील हॉकीचा स्तर खूपच उच्च आहे आणि इथला अनुभव आमच्यासाठी अमूल्य असल्याचे आधीच जाहीर केले आहे. राजगीरमधील आशिया कपनंतर कझाकस्तानची ही दुसरी भेट असून या वेळेस त्यांनी अधिक तयारी, अधिक आक्रमकता आणि अधिक आत्मविश्वास घेऊन मैदानात उतरण्याचा निर्धार केला आहे. कझाकस्तानच्या आगमनामुळे भारत हे आता केवळ स्वतःसाठी नाही, तर जगासाठी हॉकीचे प्रशिक्षण पेंद्र बनत असल्याचे जाणवू लागले आहे आणि हीच खरी क्रीडा महासत्तेकडे वाटचाल आहे.

### फिफाने इस्रायलला ठोठावला दंड

**नवी दिल्ली** : फुटबॉलची जागतिक नियामक संस्था असलेल्या फिफाने, भेदभावविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल इस्रायली फुटबॉल फेडरेशनला दंड ठोठावला आहे. मात्र, वेस्ट बँक वसाहतींमधील क्लबना परवानगी दिल्याबद्दल इस्रायलला जागतिक फुटबॉलमधून निलंबित करण्याच्या पॅलेस्टाईनच्या विनंतीवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. दरम्यान, फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी इराण आपले विश्वचषक सामने अमेरिकेतून मेक्सिकोला हलवण्याची शक्यता फेटाळून लावली आहे. इन्फँटिनो यांनी सांगितलं की, फिफाची इच्छा आहे की ही स्पर्धा नियोजित वेळेनुसारच व्हावी. या काळात फिफानं पॅलेस्टिनी फुटबॉल फेडरेशनच्या दोन स्वतंत्र याचिकांवर विचार केला. भेदभाव आणि वांशिक गैरवर्तन, तसेच अपमानास्पद वर्तन आणि निष्पक्ष खेळाच्या तत्त्वांचे उल्लंघन यांसारख्या शिस्तभंगाच्या आरोपांसाठी फिफाने इस्रायली फुटबॉल फेडरेशनला १,९०,००० अमेरिकन डॉलर्स (अंदाजे १८ कोटी रुपये) दंड ठोठावला आहे. फिफाने या बहिष्कारासाठी पॅलेस्टिनींना जबाबदार धरले आहे.





### इशान किशनला आक्रमक सेंडऑफ

**नवी दिल्ली** : इंडियन प्रीमयर लीग २०२६ स्पर्धेला २८ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेपूर्वी संघांची तयारी सुरू असून सनरायझर्स हैदराबादने सरावाचा भाग म्हणून इंटर स्क्वाड सामना नुकताच खेळला. परंतु, या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा प्रभारी कर्णधार इशान किशन याला गोलंदाजाकडून आक्रमक सेंडऑफ मिळाला आहे. सनरायझर्स हैदराबादचा शनिवारी (दि.२३) सराव सामना सुरू होता. यावेळी सामन्याच्या दुसऱ्या डावात आठव्या षटकात २६ वर्षीय लेग स्पिनर झिशन अन्सारी गोलंदाजी करत होता. या षटकात झिशनने इशानला बाद केले. यावेळी झिशन एसआरएच 'अ' संघाकडून खेळत होता, तर इशान एसआरएच 'ब' संघाकडून खेळत होता. यावेळी 'ब' संघासमोर २५४ धावांचे लक्ष्य होते. मात्र, त्यांनीही आक्रमक सुरुवात केली होती. इशानही अत्यंत आक्रमक खेळत होता आणि त्याने अर्धशतकही केले होते. यावेळी ८ व्या षटकात इशानने झिशनविरुद्ध २ षटकार आणि २ चौकार मारले होते. अखेर ५ व्या चेंडूवर झिशनने इशानला झेलबाद केले. त्यानंतर झिशन त्याच्यासमोर येत त्याला रागात 'जा' असे सांगत होता. त्याचा आक्रमक सेंडऑफ पाहून इशानही हसू लागला. इशानने २४ चेंडूत ७२ धावा केल्या. दरम्यान, झिशन आणि इशान यांच्यातील ही घटना फार गंभीर नव्हती.

# आयपीएलला दुखापतींचे ग्रहण

## ● अनेक दिग्गजांच्या खेळण्यावर प्रश्नचिन्ह; सनराझर्स हैद्राबादचे पैसे पाण्यात?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

**इंडियन प्रीमियर लीगचा १९ वा हंगाम काही दिवसांत सुरु होत आहे. यापूर्वी, केवळ एक-दोन नव्हे, तर अर्धा डझन खेळाडूंच्या दुखापती आणि अनुपलब्धतेच्या बातम्या समोर येत असून संघांमधील तणाव वाढला आहे. त्यामुळे नवीन हंगामाच्या सुरुवातीच्या आनंदाऐवजी, क्रिकेट वर्तुळात आता दुखापतींच्याच चर्चा सुरु आहेत. केकेआर, सीएसके आणि राजस्थान रॉयल्सनंतर आता सनरायझर्स हैद्राबादला दुखापतींचा फटका बसला आहे.**



ऑस्ट्रेलियाचा उदयोन्मुख खेळाडू जॅक एडवर्ड्स आयपीएल २०२६ मधून बाहेर पडल्याची माहिती समोर आली आहे. त्याला सनरायझर्स हैद्राबादने लिलावात मूळ किमतीच्या १६ पट अधिक किमतीला विकत घेतले होते. त्याची मूळ किंमत ५० लाख रुपये होती, परंतु बोली ३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली होती. जॅकमध्ये फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीने सामने जिंकण्याची क्षमता आहे. तो या मोठ्या टी-२० लीगमध्ये पहिल्यांदाच खेळणार होता; परंतु, यावेळी त्याचे स्वप्न भंगले आहे.

त्याचबरोबर सनरायझर्स हैद्राबादचा कर्णधार पॅट कमिन्स पाठीच्या दुखापतीमुळे पहिले दोन ते तीन सामने खेळू शकणार नाही. तर, आरसीबीचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड अकिलीस आणि हॅमस्ट्रिंगच्या समस्यांमुळे सलामीचे सामने खेळणार नाही. लॉकी फर्ग्युसन आयपीएल २०२६ मध्ये पंजाब किंग्सकडून खेळणार आहे. परंतु, तो सुरुवातीचे सामने खेळणार नाही. त्याला नुकताच मुलगा झाला असून त्याला आपल्या कुटुंबासोबत काही वेळ घालवायचा आहे. त्यामुळे आयपीएलबाबत क्रिकेट वर्तुळात दुखापतींच्या चर्चा सुरू आहेत.

### अनेक दिग्गज आयपीएलच्या बाहेर

सनरायझर्स हैद्राबादचा २५ वर्षीय ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जॅक एडवर्ड्स सध्या दुखापतग्रस्त असून तो स्पर्धेसाठी तंदुरुस्त नाही. त्याच्यासह चेन्नई सुपर किंग्सचा नॅथन एलिस आणि राजस्थान रॉयल्सचा सॅम करन हे दुखापतीमुळे संपूर्ण हंगामासाठी बाहेर झाल्याचे समोर आले आहे. तसेच, पॅट कमिन्स, जोश हेझलवूड, लॉकी फर्ग्युसन आणि मथिशा पाथिराना यांसारखे अनुभवी खेळाडू सुरुवातीचे सामने खेळू शकणार नाहीत.

### केकेआर समस्यांच्या गर्तेत

अलीकडेच, केकेआरचा गोलंदाज हर्षित राणा गुडघ्याच्या शस्त्रक्रियेतून पूर्णपणे बरा न झाल्यामुळे संपूर्ण हंगाम खेळू शकणार नाही. तसेच, केकेआरने १८ कोटी रुपयांना विकत घेतलेला मथिशा पाथिराना देखील तंदुरुस्तीच्या समस्यांशी झुंजत आहे. २०२६ च्या टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्ध तो जखमी झाला होता. तो खेळू शकेल की नाही, हे अद्याप निश्चित झालेले नाही.

## जिल्हा क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन

### चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती

| अलिबाग | प्रतिनिधी |

मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम तथा खेळ मंत्रालय भारत सरकार व प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने वेश्वी येथील पी.एन.पी. महाविद्यालयात जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून जिल्हाधिकारी किशन जावळे, पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्यासह मेरा युवा भारत जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी भारत सरकार तथा प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी, स्पर्धा विश्व अकॅडमी संचालिका सुचिता साळवी, क्रीडा शिक्षक तेजस म्हात्रे, यतीराज पाटील, पंच पुरुषोत्तम पिंगळे, नंदकुमार वरसोलकर आदी उपस्थित होते. दरम्यान, जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी उपस्थित बहुसंख्य खेळाडूंना शुभेच्छा व मार्गदर्शन करताना, खेळाचे आपल्या आयुष्यातील महत्त्व पटवून दिले. चित्रलेखा पाटील यांनी, स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा देत क्रीडा क्षेत्रात जास्तीत जास्त खेळाडू पुढे यावेत याकरिता खेळाडूंना नेहमीच सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

या स्पर्धेत गोळा फेक मुलांमध्ये स्वराज शिंदे प्रथम, मीत राऊत द्वितीय, भावेश भगत तृतीय, तर मुलींमध्ये कीर्ती कडवे प्रथम, हर्षाली गावंड द्वितीय व साक्षी पाटील हिने तृतीय क्रमांक पटकावला. ४०० मीटर धावणे मुलांमध्ये यश म्हात्रे प्रथम, सुशांत मढवी द्वितीय, अक्षय लेंडी तृतीय, तर मुलींमध्ये साक्षी शिंदे प्रथम, आशिष पाटील द्वितीय व अक्षता वार्डे हिने तृतीय क्रमांक पटकावला. कबड्डी स्पर्धा मुलांमध्ये विभागीय स्पोर्ट्स खारेपाट विभाग प्रथम व जय हनुमान मंडळ मुरुडने द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच, खो-खो स्पर्धा मुलींमध्ये प्रिझम सामाजिक विकास संस्था प्रथम व कुलाबा क्रीडा प्रबोधनी अलिबागने द्वितीय क्रमांक पटकावला. सर्व विजेत्या खेळाडूंना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमित पुंडे यांनी केले. तर, आभार तपस्वी गोंधळी यांनी मानले.

## आजपासून मोरे स्मृती चषकाला सुरूवात

| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |

लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत आत्माराम मोरे प्रतिष्ठान तर्फे ज्येष्ठ पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती चषक 'आंतर हॉस्पिटल टी-२०' क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत मुंबई शहर, उपनगर व ठाणे जिल्ह्यातील १४ नामवंत हॉस्पिटल संघांनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेला आज, दि.२३ मार्चपासून दादर येथील शिवाजी पार्कमध्ये सुरूवात होत आहे. या स्पर्धेत गतविजेता नानावटी हॉस्पिटल, उपविजेता ब्रीच कँडी हॉस्पिटल यांच्यासह कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल अंधेरी, जे.जे. हॉस्पिटल, सेव्हन हिल्स हॉस्पिटल, के.ई.एम. हॉस्पिटल, कस्तुरबा हॉस्पिटल, सायन हॉस्पिटल, सोमैया हॉस्पिटल, रहेजा हॉस्पिटल, के.आय.एम.एस. हॉस्पिटल ठाणे इत्यादी रुग्णालयीन क्रिकेट संघांचा समावेश आहे. या स्पर्धेतील उद्घाटनीय लढत लीलावती हॉस्पिटल विरुद्ध केडीए हॉस्पिटल नवी मुंबई आणि बॉम्बे हॉस्पिटल विरूद्ध जे.जे. हॉस्पिटल यांच्यात पार पडणार आहे. यादरम्यान क्रिकेटपटू प्रवीण तेजाळे व क्रीडाप्रेमी संजय कदम यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## राष्ट्रीय खो-खोपटू तेजस्विनीचे निधन

| देवरूख | प्रतिनिधी |

संगमेश्वर तालुक्यातील वांझोळे येथील राष्ट्रीय खो-खो खेळाडू तेजस्विनी जयेंद्र सनगले (१८) हिचे कोल्हापूर येथे उपचार सुरू असताना निधन झाले. पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या एका भीषण अपघातात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

या अपघातात तिच्या मेंदूला जबर मार बसल्यामुळे तिला तातडीने कोल्हापूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले होते. गेल्या दोन आठवड्यांपासून ती मृत्यूशी झुंज देत होती; मात्र, बुधवारी रात्री उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. तेजस्विनीने १२ व्या वर्षी ओडिशा (भुवनेश्वर) येथे झालेल्या १४ वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते. त्या स्पर्धेत आपल्या चपळ खेळीच्या जोरावर तिने संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती.



## आयर्लंड मालिकेचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई** : बीसीसीआयने शनिवारी (दि.२१) भारतीय संघाच्या आयर्लंड दौऱ्याची अधिकृत घोषणा केली. जून महिन्यात अफगाणिस्तानविरुद्धची एकदिवसीय मालिका संपल्यानंतर भारतीय संघ आयर्लंडमध्ये दोन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. विशेष म्हणजे, २००७ नंतर भारतीय संघ पहिल्यांदाच बेलफास्टमध्ये खेळताना दिसणार आहे. भारतीय संघाने गेल्या आठ वर्षांत (२०१८, २०२२ आणि २०२३) तीन वेळा आयर्लंडचा दौरा केला आहे.

## पीएसएलचा फ्लॉप शो

### अनेक खेळाडूंनी फिरवली पाठ

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

इंडियन प्रीमियर लीगचा १९ वा हंगाम आणि पाकिस्तान सुपर लीगचा ११ वा हंगाम जवळपास एकाचवेळी सुरू होणार आहे. पीएसएलला २६ मार्चपासून सुरुवात होत आहे, तर आयपीएलला २८ मार्चपासून सुरुवात होत आहे. अशातच आयपीएलमध्ये निवडल्या गेलेल्या परदेशी खेळाडूंनी पीएसएलकडे मात्र पाठ फिरवली आहे. अशातच आता या स्पर्धेच्या आयोजनालाही मोठा फटका बसला आहे.



दसून शनकाला राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२६ साठी करारबद्ध केले आहे. अष्टपैलू सॅम करन आयपीएलमधून दुखापतीमुळे बाहेर झाल्यामुळे त्याचा बदली शनकाला संधी देण्यात आली आहे. तो पीएसएलमध्ये लाहोर कलंदर्सचा भाग होता. मात्र, आता त्याने आयपीएलसाठी पीएसएलमधून माघार घेतली आहे. याआधी देखील काही खेळाडूंनी पीएसएलकडे पाठ फिरवून आयपीएलला पसंती दिली आहे. त्यात झिम्बाब्वेचा गोलंदाज ब्लेसिंग मुझराबनीसह काही अफगाणिस्तानच्या खेळाडूंचा सहभाग आहे. मुझराबनीला कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजूर रेहमानच्या जागेवर संधी दिली आहे. सध्या इराण-इस्त्राईल युद्धाचा परिणाम संपूर्ण आखाती देशांमध्ये आणि पश्चिम आशियात दिसून येत आहे. त्यामुळे पाकिस्तान क्रिकेटलाही याचा फटका बसला आहे. तसेच, ही स्पर्धा सध्या तरी प्रेक्षकांविना खेळवण्याचा निर्णय झाला आहे.

## आयर्नमॅनमध्ये पुण्याचे खेळाडूंची चमकले

### ■ सत्यजित जोशी, मंदीपा भाटिया यांचा पराक्रम

| पुणे | प्रतिनिधी |

न्यूझीलंडमधील टाउपो शहरात आयोजित आयर्नमॅन ७०.३ ट्रायथलॉन ही स्पर्धा पुण्यातील सत्यजित जोशी आणि मंदीपा भाटिया यांनी यशस्वीपणे पूर्ण करत दमदार कामगिरी केली. जोशी यांनी ही स्पर्धा सहा तास आठ मिनिटांत, तर भाटिया यांनी आठ तास दोन मिनिटांत पूर्ण केली. या स्पर्धेत जगभरातील सुमारे दीड हजारांहून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. तर, स्पर्धेत १.९ किमी पोहणे,







९० किमी सायकलिंग आणि २१.१ किमी हाफ मॅरेथॉन धावणे, असे तीन टप्पे खेळाडूंनी ८ तास ३० मिनिटांच्या निश्चित वेळेत पूर्ण करणे आवश्यक होते. लेक टाउपो येथून स्पर्धेला सुरुवात झाली. थंड पाणी, वेगवान वारे आणि उसळणाऱ्या लाटांमुळे पोहण्याचा टप्पा आव्हानात्मक ठरला. तर सायकलींदरम्यान चढ-उतार असलेले मार्ग आणि वेगवान वाऱ्यामुळे खेळाडूंच्या सहनशक्तीची कसोटी लागली असल्याचे दोन्ही खेळाडूंनी सांगितले.

भाटिया यांनी, ही स्पर्धा बॉयंट अर्क्टिक्सचे प्रशिक्षक प्रतीक जवडेकर आणि एबीसीडी मल्टी-स्पोर्ट्सचे प्रशिक्षक ओंकार जोकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केली.

## जय हनुमान जानवली विजयी

**नांदगाव** : उत्तम इलेव्हन कोळोशी बौद्धवाडी तर्फे ओव्हर आर्म टेनिस बॉल क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जय हनुमान जानवली संघाने महापुरुष तिवरे संघावर मात करत चषकावर आपले नाव कोरले. त्यामुळे महापुरुष तिवरे संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. बलाढ्य संघांचा भरणा असलेली ही स्पर्धा अतिशय चुरशीची झाली. शिरगाव आणि वळीवंडे संघांना उपांत्य फेरीत धूळ चारत जय हनुमान जानवली व महापुरुष तिवरे संघांनी दिमाखात अंतिम फेरीत प्रवेश केला. शेवटपर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या अंतिम सामन्यात अंतिम षटकांत दोन खराब चेंडूंवर मोठे फटके मारत जानवली संघाने चषकावर आपले नाव कोरले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभावेळी मंडळाचे अध्यक्ष सिद्धार्थ तांबे, चारुहास इंदप, सुशील इंदप, सुचिता पोकळे, विश्वनाथ कदम, डी. बी. करडे, कृष्णा कदम, दामिनी कदम, उत्तम सावंत, सोमा कदम, उत्तम इलेव्हन कोळोशी बौध्दवाडीचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. विश्वनाथ कदम यांनी सूत्रसंचालन केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी उत्तम इलेव्हनचे सर्व खेळाडू, महिला व मुलांनीही विशेष परिश्रम घेतले.

### चाहत्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन | हिटमॅन रोहित शर्माचे आश्वासन

## मुंबई इंडियन्स सहाव्या जेतेपदासाठी सज्ज

| मुंबई | प्रतिनिधी |

**इंडियन्स प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे. सर्व संघही सध्या अंतिम तयारीला लागले आहेत. यादरम्यान, फ्रँचायझींचे काही खास कार्यक्रमही होत आहेत. नुकताच शनिवारी (दि.२१) मुंबई इंडियन्सचा कार्यक्रम पार पडला. यावेळी रोहितने चाहत्यांना ६ व्या आयपीएल चषकासाठी प्रयत्न असेल, असा शब्दही दिला आहे.**




मुंबई इंडियन्सने २०१३, २०१५, २०१७, २०१९ आणि २०२० असे पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद मिळवले आहे. हे पाचही विजेतीपदे मुंबईने रोहित शर्माच्या नेतृत्वात जिंकली होती. मात्र, गेल्या ५ हंगामात मुंबईला अंतिम सामनाही गाठता आलेला नाही. त्यामुळे गेल्या ५ वर्षांपासून ते सहाव्या विजेतेपदाच्या प्रतिक्षेत आहेत. मुंबई इंडियन्सचा कार्यक्रम शनिवारी जिओ वर्ल्ड गार्डन्सला पार पडला. यावेळी मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्मासह सध्याचा कर्णधार हार्दिक पांड्या देखील उपस्थित होता. तसेच, मुंबई इंडियन्समधील सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, जसप्रीत बुमराहसह अनेक खेळाडूही हजर होते. यावेळी रोहित शर्माने हातात माईक घेत चाहत्यांना उद्देशून, 'यावेळी ६ वी ट्रॉफी तुमच्याकडे', अशी घोषणा केली. तसेच, ही घोषणा त्याने शेजारी उभ्या असलेल्या हार्दिक आणि सूर्यकुमारलाही करायला लावली. या कार्यक्रमात बोलतामा रोहित म्हणाला की, मी तुमच्या सर्वांचे माझ्या संघाच्यावतीने आभार मानतो. दरवर्षीप्रमाणेच आम्हाला पाठिंबा देत राहा, आम्हाला ते आवडते. त्याबदल्यात आम्ही यावेळी ६ वी ट्रॉफी जिंकण्याचा प्रयत्न करू, असे रोहित शर्मा म्हणाला.

आयपीएलमध्ये आत्तापर्यंत ५ वेळा विजेतेपद केवळ दोन संघांनी मिळवले आहे. मुंबईव्यतिरिक्त केवळ चेन्नई सुपर किंग्सने ५ वेळा आयपीएलचे विजेतेपद जिंकले आहे. त्यामुळे यावेळी हे दोन्ही संघ ६ व्या ट्रॉफीसाठी उत्सुक असणार आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)